


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

रविवार, दि. २४ नोव्हेंबर २०२४




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ३ रे | अंक : ०५८ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com

Editor : Dr. Vishwasrao Anandrao Arote | Registration no. MAHMAR/2021/82132 | Pages : 4 | Year : 3rd | Issue : 058 | Amount : 4 Rs/- | Gmail : punegavkari@gmail.com




प्रकाशक : श्री. संजय मोरे (शिवसेना सचिव)

Matter related to "Clock" symbol of the NCP is sub-judice in the Supreme Court

# अहिल्यानगरमध्ये महायुतीचा डंका

एकेकाळी काँग्रेस, राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यात या निवडणुकीत भाजप, शिंदे सेना, अजितदादांची राष्ट्रवादी यांनी जोरदार मुसंडी मारत महाविकास आघाडीचा सुपडा साफ केला. भारतीय जनता पक्षाने जिल्ह्यात ५, शिंदे-शिवसेना २, अजित पवार राष्ट्रवादी ४ अशा १२ पैकी तब्बल ११ जागांवर विजय मिळवला तर काँग्रेस महाआघाडीला केवळ श्रीरामपूरची जागा राखण्यात यश मिळाले आहे. संपूर्ण राज्यात महायुतीने महाविकास आघाडीला धूळ चारत एकहाती सत्ता मिळविली. हीच परिस्थिती अहिल्यानगर जिल्ह्यात देखील दिसून आली. शिर्डीतून राधाकृष्ण विखे (भाजप), संगमनेर अमोल खताळ (शिंदे सेना), पाथर्डी मोनिका राजळे (भाजप), श्रीगोंदा विक्रम पाचपुते (भाजप), पारनेर काशिनाथ दाते (अजितदादा राष्ट्रवादी), अहिल्यानगर शहर संग्राम जगताप (राष्ट्रवादी अजितदादा), कोपरगाव आशुतोष काळे (अजित पवार), अकोले डॉ. किरण लहामटे (अजितदादा राष्ट्रवादी), नेवासा विठ्ठल लंघे (शिंदे सेना), कर्जत जामखेड राम शिंदे (भाजप - निकाल प्रलंबित) तर श्रीरामपूर हेमंत ओगले (काँग्रेस) यांनी विजय मिळवला. जिल्ह्यातील दिग्गज नेते बाळासाहेब थोरात, शंकरराव गडाख, प्राजक्त तनपुरे, लहु कानडे, राणी लंके, वैभव पिचड यांचा दारूण पराभव झाल्याने महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे.

## संगमनेर



अमोल खताळ (शिवसेना शिंदे)
एकूण मते - ११२३८६

बाळासाहेब थोरात (काँग्रेस)
एकूण मते - १०१८२६

## अकोले



डॉ. किरण लहामटे (राष्ट्रवादी अजितदादा)
एकूण मते - ७३९५८

अमित भांगरे (राष्ट्रवादी शरद पवार)
एकूण मते - ६८४०२

वैभव पिचड (अपक्ष)
एकूण मते - ३२७८३

## कोपरगाव



आशुतोष काळे (राष्ट्रवादी अजितदादा)
एकूण मते - १६११४७

अॅड. संदीप वर्पे (राष्ट्रवादी शरद पवार)
एकूण मते - ३६५२३

## शिर्डी



राधाकृष्ण विखे (भाजपा)
एकूण मते - १४४७७८

प्रभावती घोगरे (काँग्रेस)
एकूण मते - ७४४९६

डॉ. राजेंद्र पिपाडा (अपक्ष)
एकूण मते - १५१०

## अ. नगर



संग्राम जगताप (राष्ट्रवादी अजितदादा)
एकूण मते - ११७३३२

अभिषेक कळमकर (राष्ट्रवादी एसपी)
एकूण मते - ७७८८०

## श्रीगोंदा



विक्रम पाचपुते (भाजपा)
एकूण मते - ९९००५

अनुराधा नागवडे (शिवसेना युबीटी)
एकूण मते - ५३१७६

राहुल जगताप (अपक्ष)
एकूण मते - ६२१७८

## राहुरी



शिवाजीराव कर्डिले (भाजपा)
एकूण मते -

प्राजक्त तनपुरे (राष्ट्रवादी शरद पवार)
एकूण मते -

## श्रीरामपूर



हेमंत ओगले (काँग्रेस)
एकूण मते - ६६०९९

लहु कानडे (राष्ट्रवादी अजितदादा)
एकूण मते - ४२५७१

भाऊसाहेब कांबळे (शिवसेना युबीटी)
एकूण मते - ५२७२६

## शेवगाव



मोनिका राजळे (भाजपा)
एकूण मते - आघाडीवर

प्रताप ढाकणे (राष्ट्रवादी शरद पवार)
एकूण मते - पिछाडीवर

## कर्जत जामखेड



रोहित पवार (राष्ट्रवादी शरद पवार)
एकूण मते - 127676

राम शिंदे (भाजपा)
एकूण मते - 126433

सर्व विजयी उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन !



## नेवासा



विठ्ठलराव लंघे (शिवसेना शिंदे)
एकूण मते - ९५४४४

शंकरराव गडाख (शिवसेना युबीटी)
एकूण मते - ९१४२३

## पारनेर



काशिनाथ दाते (राष्ट्रवादी अजितदादा)
एकूण मते - ११२७७५


राणी लंके (राष्ट्रवादी शरद पवार)
एकूण मते - ११०३६९

# पराभूत दिग्गज

ज्यांचे संपूर्ण आयुष्य राजकारणात गेले, काहींच्या आयुष्यातील ही शेवटची निवडणुक होती असे अनेक पक्षातील दिग्गज नेते या निवडणुकीत धक्कादायकरित्या पराभूत झाले. मुख्यमंत्री, अनेक महत्वाच्या खात्यांचे मंत्रीपद सांभाळणारे असे दिग्गज नेते पराभूत झाल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. ज्यांचा कधी पराभव होऊ शकत नाही अशा नेत्यांना सर्वसामान्य नेत्यांनी या निवडणुकीत पराभूत केले. त्यामुळे २०२४ ची ही निवडणुक अनेक अर्थांनी महत्वपूर्ण ठरणार आहे.



बाळासाहेब थोरात (काँग्रेस)
पृथ्वीराज चव्हाण (काँग्रेस)
यशोमती ठाकूर (काँग्रेस)



के. सी. पाडवी (काँग्रेस)
धीरज देशमुख (काँग्रेस)
रवींद्र धंगेकर (काँग्रेस)




नवाब मलिक (राष्ट्रवादी अजित पवार)
झिशान सिद्दीकी (राष्ट्रवादी अजित पवार)
अमित ठाकरे (मनसे)



सदा सरवणकर (शिवसेना शिंदे)
मिलींद देवरा (शिवसेना शिंदे)
शहाजी बापू (शिवसेना शिंदे)



बच्चू कडू (प्रहार)
राजेंद्र शिंगणे (राष्ट्रवादी-शरद पवार)
राजू पाटील (मनसे)



यामिनी जाधव (शिवसेना शिंदे)
अविनाश जाधव (मनसे)
राजन विचारे (शिवसेना)



प्राजक्त तनपुरे (राष्ट्रवादी शरद पवार)
लहु कानडे (राष्ट्रवादी अजित पवार)
माणिकराव ठाकरे (काँग्रेस)



बाळा नांगगावकर (मनसे)
हर्षवर्धन पाटील (राष्ट्रवादी शरद पवार)
समरजीत घाडगे (राष्ट्रवादी शरद पवार)



रोहिणी खडसे (काँग्रेस)
केदार दिघे (शिवसेना युबीटी)
शंकरराव गडाख (शिवसेना)

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ गांवकरी

रविवार, दि. २४ नोव्हेंबर २०२४






## थोडक्यात...



### दौंड- राहुल कुल यांची हॅटट्रिक

दौंड (समर्थ गांवकरी) : पुणे जिल्ह्यातील दौंड विधानसभा मतदारसंघात भाजप उमेदवार तथा विद्यमान आमदार राहुल कुल हे तब्बल 13 हजार 889 मतांच्या फरकाने विजयी झाले आहे. राहुल कुल हे 2014 च्या निवडणुकीत 11345 मतांच्या फरकाने विजयी झाले व 2029 च्या निवडणुकीत त्यांनी 746 मतांच्या फरकाने निसटता विजय मिळविला होता. 2014 पासूनच्या सलग तीन विधानसभा निवडणुका जिंकत त्यांनी हॅटट्रिकची नोंद केली आहे. अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील नगर मोरी येथील शासकीय धान्य गोदामात आज (ता. 23) सकाळी साडेआठ वाजता निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी गणेश मरकड यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणीस सुरवात झाली. निवडणूक निरीक्षक तथा भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी म्हणून एम. गौतमी या वेळी उपस्थित होत्या. दौंड मतदारसंघातील 3,19, 311 मतदारांपैकी 2 लाख 36 हजार 873 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यापैकी 2 लाख 35 हजार 479 मते वैध ठरली. तर 183 मते अवैध ठरली. मतदारसंघात 13 पुरुष व 1 महिला,असे एकूण 14 उमेदवारांनी निवडणूक लढविली होती.

### महायुतीच्या विजयाने बिहारच्या आगामी निवडणुकीची पायाभरणी केली

मुंबई (समर्थ गांवकरी) : गेल्या दोन महिन्यांपासून महाराष्ट्राला पडलेल्या प्रश्नांची आज साऱ्यांनाच उत्तरे मिळाली. विधानसभेत महायुती की महाआघाडी? यावर आज निकाल आला. भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीने 200 पार मजल मारून थेट बहुमताचा आकडा गाठला. तर काँग्रेस-ठाकरे गट-शरद पवार गट महाविकास आघाडीला मोठा फटका बसला. मविआला जेमतेम पन्नाशी गाठता आली. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सकाळी आठ वाजल्यापासून सुरु झाली होती. यंदाच्या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास अशी टफ-फाईट दिसून येईल, असे तज्ज्ञांसह एक्झिट पोल्सचा अंदाज होता. मात्र मतमोजणी सुरु होऊन अवघ्या काही तासांतच भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीने आधी शंभरी पार केली, मग बहुमताचा आकडा ओलांडला आणि अखेर 200 पार मजल मारली. महायुतीच्या या विजयाने आगामी बिहार विधानसभेच्या निवडणुकीची पायाभरणी केली, असे मत केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी व्यक्त केला. "महाराष्ट्रात प्रचंड बहुमताच्या जोरावर भाजपा महायुतीचे सरकार पुन्हा एकदा विजयी झाले आहे. हा बाब खूपच मोठा आणि ऐतिहासिक विजय आहे. महाराष्ट्रात विभिन्न प्रकारचे नॅरेटिव्ह सेट केले जात होते, विविध धारणा बनवण्याचा प्रयत्न केला जात होता, या सगळ्याचा मतदार जनतेने उत्तर दिले आहे.

# राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार

## राज्यात भाजप ठरला सर्वात मोठा पक्ष

मुंबई : (समर्थ गांवकरी)

विधानसभा निवडणुकीचा निकाल अखेर हाती आला आहे. लोकसभा निवडणुकीत फटका बसलेल्या महायुतीने विधानसभा निवडणुकीत मात्र जोरदार मुसंडी मारली आहे. महायुतीला महाराष्ट्रात स्पष्ट बहुमत मिळालं आहे. तब्बल 230 विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. 132 जागांसह भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर शिवसेना शिंदे गटाला 57 जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रवादी अजित पवार गटाला 41 जागांवर विजय मिळाला आहे. मात्र दुसरीकडे महाविकास आघाडीचा राज्यात मोठा पराभव झाला आहे. मविआला केवळ 45 जागाच मिळाल्या आहेत. या ऐतिहासिक विजयावर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानले आहेत.

आज महाराष्ट्रात विकासवादाचा विजय झाला आहे. आज महाराष्ट्रात सुशासनाचा विजय झाला आहे. महाराष्ट्रात खऱ्या सामाजिक न्यायाचा विजय झाला आहे. आज महाराष्ट्रात खोटेपणा, धोका यांचा अत्यंत वाईटपद्धतीने पराभव झाला आहे. ज्यांनी विभाजनाचा प्रयत्न केला ते आज हारले. महाराष्ट्रात नकारात्मक राजकारणाचा पराभव झाला आहे. महाराष्ट्राने विकसीत भारताच्या संकल्पाला आणखी मजबूत केलं आहे. आज मी भाजप आणि एनडीएच्या सर्व कार्यकर्त्यांचं अभिनंदन करतो, त्यांना या ऐतिहासिक विजयाच्या शुभेच्छा देतो. मी एकनाथ शिंदे आमचे परममित्र देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचं कौतुक करतो असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचं नाव न घेता त्यांना जोरदार टोला लगावला आहे. मध्यंतरी काही लोकांनी आम्हाला धोका दिला, राज्यात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र महाराष्ट्राने त्यांना आज उत्तर दिलं आहे. मित्रांनो आज देशाच्या अनेक राज्यातील पोटनिवडणुकीचे देखील निकाल लागले आहेत लोकसभेत आमचं आणखी एक सीट वाढलं आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थानने भाजपला खूप सपोर्ट केला आहे. आसामने पुन्हा एकदा भाजपावर विश्वास दाखवला आहे. मध्य प्रदेशमध्ये देखील आम्हाला यश मिळालं आहे. बिहारमध्ये देखील आमचं समर्थन वाढलं आहे. यावरून एक लक्षात येतं की देशाला आता फक्त विकास पाहिजे. मी महाराष्ट्रातील जनतेचे, मात भगिनींचे आणि शेतकऱ्यांचे आभार मानतो. महाराष्ट्र आता विकासाच्या वाटेवर अधिक वेगानं धावेल असं अश्वासन यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलं आहे.



## नारीशक्ती, भीमशक्तीमुळे महायुतीचा ऐतिहासिक महाविजय : आठवले

मुंबई : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रात महायुतीचा महाविजय झाला आहे. राज्यात लाडक्या बहिणीची नारीशक्ती; सर्व समाज घटकांचा कौल महायुतीला मिळाला त्यासोबत दलित, बौद्ध आंबेडकरी जनतेने महायुतीला भरघोस मतदान केल्यामुळे महायुतीचा ऐतिहासिक विजय झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेला आहे देशाचा विकास; त्यामुळे दिसत आहे महायुतीच्या विजयाचा विकास; आम्हाला दिसत आहे निळे निळे आकाश ; महाविकास आघाडी झाली आहे भकास अशी चारोळी सादर करीत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी



महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या झालेल्या ऐतिहासिक विजयाचे स्वागत केले आहे.

## विधानसभा पराभवावर चिंतन करु : नाना पटोले

मुंबई : (समर्थ गांवकरी)

विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सुरू आहे. अवघ्या राज्याचे लक्ष काय निकाल लागणार याकडे लागले आहे. जवळपास सर्वच ठिकाणचे चित्र स्पष्ट झालेले आहे. अनेक ठिकाणी उमेदवार विजयी घोषित करण्यात आले आहेत. महायुतीचा दणदणीत विजय झाला असून, महाविकास आघाडी चांगलीच चितपट झाल्याचे पाहायला मिळत आहे. अद्यापही अनेक ठिकाणचे अंतिम निकाल येणे बाकी असले तरी राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाष्य केले आहे.

साकोली मतदारसंघातून नाना पटोले उमेदवार होते. नाना पटोले यांना अवघ्या २०८ मतांनी विजय झाला. भाजपा



उमेदवार अविनाश ब्राह्मणकर यांचा पराभव केला. पत्रकारांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, विधानसभेचा निकाल अनपेक्षित असून वरिष्ठ पातळीवर या निकालाचे विश्लेषण केले जाईल. परंतु नव्या सरकारने जनतेल्या दिलेली लाडकी बहीण योजना सुरु ठेवावी, शेतकरी कर्जमाफी, शेतीला २४ तास वीज पुरवठा, सोयाबीनला ६ हजार, कापसाला ९ हजार तर धानाला १ हजार रुपये बोनस, एमएसपीपेक्षा कमी भाव मिळाला तर फरकाची रक्कम देणे, तरुणांना नोकऱ्या, भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र करण्याच्या आश्वासवाची पूर्तता करावी तसेच महाराष्ट्राची संपत्ती विकण्याचे थांबवून राज्याची तिजोरी चांगली करावी, अशी अपेक्षा नाना पटोले यांनी व्यक्त केली.

निवडणुकीच्या प्रचारात महाविकास आघाडीच्या सभांना जनतेचा चांगला प्रतिसाद मिळाला उलट भाजपा युतीचे नेते व पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभेलाही जनतेचा प्रतिसाद मिळत नव्हता अशा परिस्थितीत आलेला निकाल अनपेक्षित वाटतो. या पराभवावर चिंतन करु व जनतेच्या प्रश्नासाठी काम करत राहू, असे नाना पटोले यांनी सांगितले.

दरम्यान, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल जनतेच्या अपेक्षित भावनांच्या विरोधातील आहे. एक्झिट पोल मध्येही भाजपा युती व महाविकास आघाडी यांच्यात काटें की टक्कर दिसली. परंतु आज आलेला निकाल हा अविश्वसनीय, अनाकलनीय व अस्वीकार्ह आहे. जनतेचाही या निकालावर विश्वास बसलेला नाही. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा अत्यंत कमी मताने विजया झाला तर आठ वेळा विजयी झालेले बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह काँग्रेसच्या महत्त्वाच्या नेत्यांचा पराभव झाला आहे. या पराभवाची जबाबदारी आपण घेत आहोत असे सांगून जनतेच्या प्रश्नासाठी व लोकशाहीच्या बचावासाठी काँग्रेस पक्ष यापुढेही अधिक जोमाने काम करत राहील, असे रमेश चेन्नीथला म्हणाले.

## मुस्लिमबहुल मतदारसंघात भाजपचा हिंदू शिलेदार विजयी

### विरोधात 11 मुस्लिम उमेदवार

मुंबई : (समर्थ गांवकरी)

आज महाराष्ट्र आणि झारखंडसह उत्तर प्रदेशातील पोटनिवडणुकीचेही निकाल लागले. या पोटनिवडणुकीत भाजपने मोठा विजय मिळवला आहे. 9 पैकी 6 जागांवर भाजपचा विजय झाला आहे. मात्र, यामध्ये कुंडरकी मतदारसंघाचे सर्वाधिक चर्चा सुरू आहे. याचे कारण म्हणजे, 60 टक्के मुस्लिम मतदार असलेल्या या जागेवर भाजपचा हिंदू उमेदवार विजयी झाला आहे.

कुंडरकी जागेवर भाजपने आपला 31 वर्ष जुना विक्रम मोडला आहे. भाजपने शेवटची ही जागा 1993 मध्ये जिंकली होती. यावेळी भाजपचे रामवीर सिंह 1 लाख 31 हजार मतांनी विजयी झाले. तर सपाचे हाजी रिजवान यांना फक्त 20 हजार मते मिळाली. विशेष म्हणझे, मुरादाबाद जिल्ह्यात 60 टक्क्यांहून अधिक मुस्लिम मतदार आहेत आणि विधानसभा जागा जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावता.

मुरादाबादच्या कुंडरकी जागेवर भाजपचे उमेदवार रामवीर सिंह ठाकूर आणि समाजवादी पक्षाचे उमेदवार हाजी रिझवान यांच्यात चुरशीची लढत पाहायला हवी होती. मात्र आश्चर्याची बाब म्हणजे या जागेवर समाजवादी पक्षाच्या उमेदवाराला फक्त 20 हजार मते मिळाली. विशेष म्हणजे, ही जागा



सपाचा बालेकिल्ला मानली जाते. सपा उमेदवारावर असलेला जनतेचा राग आणि गेल्या ८ वर्षांपासून सक्रीयतेने लोकांचे काम केल्यामुळे भाजप उमेदवार रामवीर सिंह ठाकूर यांना मुस्लिम समाजातील लोकांनी पाठिंबा दिला.

कुंडरकी विधानसभा जागेवर भाजपचे उमेदवार रामवीर सिंह यांना 1 लाख 70 हजार 371 मते मिळाली आहेत, तर त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी समाजवादी पक्षाचे मोहम्मद रिझवान यांना फक्त 25 हजार 580 मते मिळाली. अशाप्रकारे रामवीर सिंह यांनी 1 लाख 44 हजार 791 मतांनी विजय मिळवला. या जागेवर रामवीर व्यतिरिक्त अन्य 11 उमेदवार होते. हे सर्व उमेदवार मुस्लिम समाजाचे होते. मुस्लिमबहुल जागेवर रामवीर सिंगची जादू अशी चालली की, सर्व उमेदवारांचा सुपडा साफ झाला. या जागेवरील 5 पेक्षा जास्त उमेदवारांना NOTA पेक्षाही कमी मते मिळाली आहेत. तर, बहुजन समाज पक्ष कसातरी एक हजाराचा टप्पा गाठू शकला. रामवीर सिंह यांनी मेहनत, निवडणुकीच्या प्रचारात रात्रंदिवस काम करणे, घरोघरी जाऊन जनतेकडे मतं मागणे आणि प्रचारादरम्यान 'जैसा देश, वैसा भेस' या रणनीतीमुळे भाजपच्या विजयाचा मार्ग सुकर केला.

## महाराष्ट्रात ओवेसींचं '15 मिनिट'चं राजकारण 'फुस्स'

मुंबई : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील मुस्लिमांनी असदुद्दीन ओवेसी यांच्या आशा धुळीस मिळवल्या आहेत. ना ओवेसी बंधूंचे '15 मिनिट'चे राजकारण चालले, ना स्वतःला मुस्लिमांचा नेता म्हणवून घेण्याची खेळी कामी आली. याउलट, ओवेसी बंधूंनी ज्या घोषणेच्या सहाय्याने महाराष्ट्राच्या निवडणुकीत हिंदू आणि मुस्लीम यांच्यात ठिणगी टाकण्याचा प्रयत्न केला, निवडणुकीला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या कृत्याला महाराष्ट्रातील जनतेकडून चोख प्रत्युत्तर मिळाले आहे. असदुद्दीन ओवेसी यांचा पक्ष एआयएमआयएम आपली स्थिती बळकट करण्यासाठी मराराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत उतरला होता. त्यांची नजर मुस्लीम आणि दलित मतदानावर होती. मात्र, त्यांच्या पक्षाची कामगिरी वाटली होती तशी झाली नाही.

ओवेसी यांच्या AIMIM ने एकूण 16 उमेदवार महाराष्ट्र विधानसभेच्या मैदानात उतरवले होते. यांपैकी, 15 ओवेसी यांच्या उमेदवारांचा पराभव झाला. 4 जागांवर AIMIM दुसऱ्या क्रमांकावर राहिला. तर मालेगांव मध्यमध्ये एआयएमआयएमच्या उमेदवाराचा विजय झाला आहे. येथे मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक यांचा विजय झाला. ते केवळ 162 मतांनी विजयी झाले आहे. त्यांना 109653 मते मिळाली आहेत.

# 17 मोठ्या नेत्यांना चाखावी लागली पराभवाची धूळ...!

मुंबई : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले. यात, महायुतीला अति प्रचंड बहुमत मिळल्याचे तर महाविकास आघाडीचा पार सुपडा साफ झाल्याचे दिसत आहे. या निवडणुकीत अनेक मोठ्या आणि दिग्गज चेहऱ्यांनाही पराभवाची धूळ चाखावी लागली. यात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांच्या पासून ते मंत्री राहिलेल्या नेत्यांचाही समावेश आहे.

**बाळासाहेब थोरात** - या यादीत सर्वात धक्कादायक नाव म्हणजे, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात. संगमनेरमध्ये शिवसेनेचे अमोल खताळ यांनी त्यांचा पराभव केला. 10500 हून अधिक मतांनीत्यांचा पराभव झाला.

**नवाब मलिक** - राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) नेते नवाब मलिक यांचा शिवाजी मानखुर्द जागेवर



पराभव झाला आहे. अबू आझमी यांनी त्यांचा पराभव केला. ते 30 हजारहून अधिक मतांनी पराभूत झाले आहेत.

**पृथ्वीराज चव्हाण** - या यादीत माजी मुख्यमत्री पृथ्वीराज चव्हाण यांचेही नाव आहे. कराड दक्षिणमधून त्यांचा पराभव झाला. भाजपचे अतुलबाबा भोसले यांनी त्यांचा पराभव केला.

**संजय काका पाटील** - तासगाव कवठेमहंकाळ येथे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे संजय काका पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे रोहीत पाटील यांनी पराभव केला. त्यांचा 15 हजारहून अधिक मतांनी पराभवझाला.

**इम्तियाज जलील** - छत्रपती संभाजीनगरमधील औरंगाबाद पूर्वमध्ये बाजप नेते अतुल सावे यांनी एआयएमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलील यांचा पराभव केला. जलील यांचा जळवपास 2 हजार मतांनी पराभव झाला.

**हर्षवर्धन पाटील** - पुणे जिल्ह्यातील इंदापूरमध्ये अत्यंत अटीतटीची लढत झाली. या लढतीत राष्ट्रवादी (अजित पवार)चे दत्तात्रय भरणे यांचा विजय झाला आहे. त्यांनी माजी मंत्री, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांचा पराभव केला. 19 हजार 410 पाटील यांचा पराभव झाला.

**राजेश टोपे** - घनसावंगीमध्ये शिवसेना शिंदे गटाचे हिकमत उढाण यांनी राष्ट्रवादा काँग्रेस शरद पवार गटाचे नेते तथा माजी मंत्री राजेश टोपे याांचा पराभव केला.

**बाळासाहेब पाटील** - कराड उत्तरमध्ये भाजपचे मनोज घोरपडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे बाळासाहेब पाटील यांचा पराभव केला आहे. पाटील यांचा 43691 मतांनी पराभव झाला.

**माणिकराव ठाकरे** - दिग्रसमध्ये शिवसेना शिंदे गटाचे संजय राठोड यांनी काँग्रेस पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यांचा पराभव केला आहे. ठाकरे यांचा 28775 मतांनी पराभव झाला आहे.

**राम शिंदे** - कर्जत जामखेडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे रोहित पवार यांनी भजप नेते राम शिंदे यांचा पराभव केला. शिंदे यांचा 1243 मतांनी पराभव झाला.

**भावना गवळी** - रिसोडमध्ये काँग्रेसचे अमित झनके यांनी शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या भावना गवळी यांचा पराभव केला. त्या तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या. या निवडणुकीत गवळी यांचा 16116 मतांनी पराभव झाला आहे.

**यशोमती ठाकूर** - तिवसा येथे भाजपचे राजेश वानखेडे यांनी काँग्रेसच्या यशोमती ठाकूर यांचा पराभव केला. ठाकरू 7617 मतांनी पराभूत झाल्या.

**के सी पाडवी** - अक्कल कुवा येथे शिवसेना शिंदे गटाचे अमश्या पाडवी यांनी काँग्रेसचे के सी पाडवी यांचा पराभव केला. पाडवी 2904 मतांनी पराभूत झाले.

**राजन विचारे** - ठाण्यात भाजपचे संजय केळकर यांनी शिवसेना ठाकरे गटाचे राजन विचारे यांचा पराभव केला. विचारे 58253 मतांनी पराभव केला.

**सदा सरवणकर** - माहिम मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे नेते सदा सरवणकर यांचा शिवसेना ठाकरे गटाचे नेते महेश सावंत यांनी पराभव केला. सदा सरवणकर यांचा 1316 मतांनी पराभव झााला.


**समरजितसिंह घाटगे** - कागलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते हसन मुश्रीफ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे समरजीत सिंह घाटगे यांचा पराभव केला आहे. घाटगे यांचा 11581 मतांनी पराभव झाला.

**बच्चू कडू** - अचलपूरमध्ये भाजपचे प्रवीण तायडे यांनी प्रहार जनशक्ती पार्टीचे बच्चूकडू यांचा पराभव केला आहे. कडू 12131 मतांनी पराभूत झाले आहेत.

# संपादकीय



## ‘थोड्याशा रुमानी’ ‘आक्रिता’ची कहाणी



मला अगदी परवा माझी पन्नाशीतली एक मैत्रीण म्हणाली, ‘अरे तुझी अमोल पालेकरांशी ओळख आहे ना? मला त्यांची भेट घालून दे. माझ्या विशीनंतर जेव्हा आई-वडिलांनी स्थळ पाहायला सुरुवात केली होती, तेव्हा माझा हट्टच होता, की मला अमोल पालेकरसारखाच कुणी हवा! माझी आई पण पालेकरांचे सिनेमे पाहूनच खुश असायची!

- मी तिला थांबवत म्हटलं की, बाई गं, येत्या २४ नोव्हेंबरला अमोल पालेकर हा अभिनेता-दिग्दर्शक, चित्रकार, सामाजिक कार्यकर्ता, मनस्वी माणूस ऐंशीव्या वर्षात पदार्पण करतोय. तर म्हणाली, ‘हे रे काय? तू काहीतरी सांगतोस. चितचोर, छोटी सी बात, रजनीगंधा, घरौंदा या सिनेमातून आपल्या अभिनयाचं तेव्हा आणि अजूनही गारुड करणारा अमोल पालेकर ऐंशी वर्षांचा? नाही पटत!’

हळूहळू माझ्या नजरेसमोर गेल्या ४५-५० वर्षांच्या आमच्या मैत्रीचा आणि चित्रपट चळवळीचा पटच सरकू लागला. १९८० च्या दशकात व आणीबाणी कालखंडातील हिंदी सिनेमा हा बासू चटर्जी, हृषिकेश मुखर्जी, राजश्री प्रॉडक्शन्स यांचा होता आणि प्रामुख्याने अमोल पालेकर या टिपिकल मध्यमवर्गीय अभिनेत्याच्या भोवतीच फिरत होता. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धाने एकूणच देशात उत्साहवर्धक परिस्थिती नव्हती. काळाबाजार फोफावला होता. राजकीय अस्थिरता होती. प्रत्येक गोष्टीच्या रेशनिंगने मध्यमवर्ग पिचला होता आणि त्याचा मोठा परिणाम विशी-पंचविशीतल्या युवकांच्या वागण्या-बोलण्यात दिसत होता. त्यातून आलेला मूर्तिमंत गबाळा बावळटपणा, नेभळट-भित्रेपणा नेमकेपणाने दिग्दर्शकांनी अमोलच्या रूपातून प्रेक्षकांसमोर आणला होता.

गावदेवीत एका मध्यमवर्गीय पण कलाप्रेमी कुटुंबातला अमोल पालेकर जगप्रसिद्ध जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्‌समधून चित्रकलेची पदवी घेतो. तिथूनच नाटकाशी नाळ जुळते आणि दुबे, बादल सरकार, तेंडुलकर, मोहन राकेश, धर्मवीर भारती अशांच्या सान्निध्यात त्याच्यातला नट व दिग्दर्शक घडत जातो. पण त्या काळात केवळ नाटक व चित्रकला यावर पोट कसं भरता येईल? म्हणून मग हा मध्यमवर्गीय एका राष्ट्रीयीकृत बँकेत कारकून होतो. म्हणजे बघा, त्याने हिंदी चित्रपटात साकारलेल्या सर्वच भूमिका या त्यांच्या वैयक्तिक जीवनाशी किती एकरूप होत्या ! मनाच्या भुकेसाठी कला आणि पोटासाठी नोकरी हाच मध्यमवर्गीयांचा स्थायीभाव आहे. गावदेवी सारस्वत कॉलनी ते जुहूतल्या ‘चिरेबंदी’ पर्यंतचा अमोल पालेकर या सामान्य माणसाचा नट, दिग्दर्शक, चित्रकार, समाजव्रती म्हणून झालेला असामान्य प्रवास मोठा व थक्क करणारा निश्चित आहे.

अमोल पालेकरांनी त्यांच्या काळात जो पिचलेला मध्यमवर्गीय नायक जिवंत केला, त्यातूनच हिंदी रुपेरी पडद्यावर अँग्री यंग मॅन जन्माला आला. किती आगळीवेगळी नाटकं, मालिका, हिंदी-मराठी, बंगाली, कानडी चित्रपटांतील अभिनय व दिग्दर्शन. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय सन्मान, अनेक चित्रप्रदर्शने, अनेक जगप्रसिद्ध पुस्तकांची जॅकेट्स आणि वेगळ्या वाटेवरचे दिग्दर्शित केलेले चित्रपट प्रेक्षकांच्या मनातून पुसले जाणारे नाहीत.

सुजाण प्रेक्षक घडविण्यासाठी महाराष्ट्रात चित्रपट संस्कृती रुजवून पालेकरांनी सुरु केलेली ‘अभिजात चळवळ’ असो, नाना पाटेकरांच्या सहयोगाने पुण्यात केलेले ‘हरित पट्टा जतन व संवर्धन’ असो, अगदी कोकणात माणगावला उभारलेले ‘आंतरभारती भवन’ असो, हे सारे पालेकरांच्या स्वभावधर्मातून फुललेलं कार्य दुर्लक्षून चालणार नाही. वाहत्या पाण्यात हात धुणारे अनेक संधिसाधू आहेत; पण अमोल पालेकर हा मनस्वी कलावंत अशा वाहत्या पाण्यापासून कायमच दूर राहिला.

अपघाताने लाभलेले भारत सरकारच्या ‘चिल्ड्रन्स फिल्म संस्थे’चे अध्यक्षपद सोडले, तर हा श्रेष्ठ नट-दिग्दर्शक आजही कोणत्याही सरकारचा लाभार्थी नाही. असं वागणारा हा माणूस कलावंत आहे का? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. पण हेच शाश्वत कलावंताला ठामपणे जगवतं. अमोल पालेकर नावाचा हा मित्र ‘आक्रित’, ‘रावसाहेबा’ सारखा आपल्याच ‘दायरा’त ‘भूमिका’ करत ‘थोडासा रुमानी’ होत; ‘छोटी सी बात’ करत ‘रजनीगंधा’चा दरवळ व ‘अंगुर’चा स्वाद देत दिग्दर्शनाचा अजोड ‘घरौंदा’ उभारण्यात ‘कच्ची धूप’ बनून आहे. बदलत्या समाज व कलाजीवनाचा मराठी आणि पर्यायाने भारतीय अस्सल ऐवज म्हणजे अमोल पालेकर ! ऐंशीव्या वाढदिवसानिमित्ताने या मित्रास अगणित शुभेच्छा!

# शिवसेनेचे राजेश गोवर्धन मोरे यांचा दणदणीत विजय

## दिव्यातील जनतेने मोरे यांचे पारडे जड केले

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

कल्याण ग्रामीण विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे राजेश मोरे यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला आहे. त्यांना कल्याण ग्रामीण मधील सुमारे 1,41,164 मतदारांनी आमदार म्हणून पसंती दिल्याचे पहावयास मिळत असून दुसऱ्या क्रमांकावर मनसे या पक्षाचे एकमेव माजी आमदार राजू पाटिल यांना एकूण 74,768 मते मिळाली आहेत, तर शिवसेना ठाकरे गटाचे सुभाष भोईर यांना तिसऱ्या क्रमांकाची 71,102 मते मिळाली. सुभाष भोईर आणि राजू पाटिल यांच्या मध्ये निवडणुकीत चुरस पाहायला मिळाली होती, या चुरशी मध्ये शिवसेना पक्षाचे राजेश मोरे यांचा मोठया मताधिक्याने झालेला विजय हा अनपेक्षित आणि अभूतपूर्व असा विजय आहे. यामध्ये शिवसेना पक्षाचा प्रचार आणि युव्हरचना यशस्वी झाल्याचे दिसत आहे.

राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार असून, मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता असल्याचे शिवसेना पदाधिकाऱ्यांचे मत आहे. दिव्यातील जनतेने देखील राजेश मोरे यांच्या पारड्यात भरभरून मते टाकली आहे मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वात शहरप्रमुख रमाकांत मढवी व उपशहर प्रमुख शैलेश पाटील, उपशाहर प्रमुख आदेश भगत, तसेच विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखाप्रमुख, आधी पदाधिकारी यांनी यावेळी अथक परिश्रम घेऊन माझा विजय साकार केला व सर्व मतदार बांधवानी दिलेला प्रेम याचे देखील आभार मानतो असे यावेली आमदार राजेश मोरे यांनी बोलताना सांगितले.



## मेंढपाळांना बिबटपासून सुरक्षेसाठी जुन्नर वन विभागामार्फत तंबूचे कवच : अमोल सातपुते

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



बिबट हल्ला,सर्पदंश तसेच पाऊस व थंडी यापासून मेंढपाळांचे संरक्षणासाठी जुन्नर वनविभागाने शुक्रवार दि:-२२ नोव्हेंबर रोजी तालुक्यातील मेंढपाळ कुटुंबांना टेंट (तंबूचे) वाटप करून एक सुरक्षा कवच प्राप्त करून दिल्याने मेंढपाळ कुटुंबातील व्यक्तींनी आनंद व समाधान व्यक्त केले.यामुळे मेंढपाळलोकांची सुरक्षा होणार अशी माहिती उपवनसंरक्षक जुन्नर अमोल सातपुते व वनपरीक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांनी दिली.

जुन्नर वनविभागात बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेता बिबट्या पासून नागरिकांचे संरक्षण व्हावे यासाठी घरगोठ्यां भोवती सौर कुंपण,नेक बेल्ट इत्यादी अनेक उपाययोजना वन विभागामार्फत राबविण्यात येत आहेत.याचाच एक भाग म्हणून उघड्यावर झोपणाऱ्या मेंढपाळा च्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आल्याचे पाहून अमोल सातपुते उपवनसंरक्षक जुन्नर यांनी त्यांचेसाठी तंबूची संकल्पना मांडली.

वनविभागा ने हे सुरक्षिततेचे पाऊल तात्काळ उचलले असून जुन्नर वनविभागातील मेंढपाळांना शासकीय निधी उपलब्ध करत मेंढपाळांना राहण्यासाठी तंबू खरेदी केले असून मेंढपाळांना सदर वाटप करण्यात येत आहेत.

टेंट(तंबू)कसा लावावा व तो जास्तीत जास्त कसा टिकेल याचे प्रात्यक्षिक रमेश खरमाळे,वनरक्षक धामणखेल नितीन विधाटे,वनपाल जुन्नर व देविदास मिसाळ,वनरक्षक जुन्नर यांनी करून दाखवले यावेळी श्रीमती,अनिता होले,वनपाल नारायणगाव,महेश बगाड वनरक्षक,ओझर,रेस्क्यू टी मेंबर,विकास मोरे,धोंडीभाऊ मोरे,विजय मोरे,अजित मोरे,तुषार मोरे तसेच ग्रामस्थ, खंडू मोरे,रमेश मोरे, किसन जाधव आदी उपस्थित होते.

प्रथमतः ८५ तंबू उपलब्ध झाले असून लवकरच उर्वरित तंबू खरेदी केले जातील व ते मेंढपाळांना उपलब्ध करून दिले जातील असे अमोल सातपुते, उपवनसंरक्षक जुन्नर यांनी सांगितले.तंबूमुळे बिबट हल्ला, सर्पदंश तसेच पाऊस व थंडी यापासून मेंढ- पाळांचे संरक्षण होण्यासाठी मदत होईल असे प्रदिप चव्हाण, वनपरीक्षेत्र अधिकारी जुन्नर म्हणाले. शिरोली बु:आगर,नेतवड, ओझर, तेजेवाडी येथील वास्तव्यास असलेल्या बंडू केरळ डोमाळे, संतोष साळु टुले, अंकुश किसन बरकडे,नानासाहेब विठोबा सूळ, उत्तम चिमा खेमनार गोरक्ष श्रीपत इरमळ,अवली राम,सिद्धू बरकडे ,सलू आप्पा क-हे राहुल सिद्धू बरकडे,दौलत सलू क-हे, कचरू सूर्यभान सुडके,नारायण कान्हू सुडके, दत्तात्रेय कान्हू सुडके,भाऊसाहेब महप्पा धरम, सुभाष नामदेव बरकडे,अशा एकुण १५ मेंढपाळांना तंबूचे वाटप अमोल सातपुते, उपवनसंरक्षक जुन्नर यांच्या हस्ते करणेत आले.




## अखेर शिंदेसेनेचे संजय गायकवाड यांनी गड राखला



**बुलडाणा : (समर्थ गांवकरी)**

बुलडाणा विधानसभा मतदार संघात २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले असून आज २३ नोव्हेंबर रोजी मत मोजणी झाली. यामध्ये सुरुवाती पासुन शिंदेसेना गटाचे उमेदवार संजय गायकवाड यांनी आघाडी घेत अटीतटीच्या लढतीत अखरे विजय मिळविला आहे. आज २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून मत मोजणी प्रक्रियेला सुरुवात झाली. यामध्ये बुलडाणा मतदार संघात घाटाखाली आणि घाटावर असे दोन भागात हा मतदार संघ विभागाला गेला असून यामध्ये काटे टक्कर ही बुलडाणा मतदार संघात पहायला मिळाली. महायुती शिंदेसेनेचे संजय गायकवाड तर महाविकास आघाडीच्या उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या जयश्रीताई शेळके यांच्यात ही लढाई झाली. मत मोजणीला सुरुवात झाल्यापासून संजय गायकवाड यांचा विजयाचा मार्ग मोकळा होत असतांना दिसून आला. अखेर त्यांनी ८४१ मताची आघाडी घेत आखरी फेरीमध्ये विजय मिळविला.

उध्दव ठाकरे यांनी बुलडाणा विधानसभेसाठी जयश्रीताई शेळके महिला नेतृत्व दिल्याने एक चांगला रंगत पहायला मिळाली. मात्र खेर विकासकामे, त्यांची वाढती लोकप्रियतेने संजय गायकवाड यांनी त्यांचे आव्हान संपुष्टात आणले. पुन्हा एकदा बुलडाणा विधानसभेसाठी संजय गायकवाड यांच्या रुपाने आमदार म्हणून लाभले आहे. या विजयाचा जल्लोष महायुतीच्या कार्यकर्त्यांनी व त्यांच्या समर्थकांनी बुलडाणा शहरात केला. यात लाडक्या बहिणी देखील मागे नव्हत्या. त्यांनी देखील नाचून आमदार संजय गायकवाड यांच्या विजयाचा आनंदोत्सव साजरा केला.




# नेवाशात "शिवसेनेचे विठ्ठलराव लंघे ४ हजार मतांनी विजयी"

**नेवासे शहर : (समर्थ गांवकरी)**

नेवासे विधानसभा मतदारसंघातून महायुतीचा घटक पक्ष असलेल्या एकनाथ शिंदे शिवसेनेचे उमेदवार विठ्ठलराव लंघे हे ९५ हजार ४४४ मते घेऊन विजयी झाले असून त्यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेनेचे उमेदवार शंकरराव गडाख यांचा ४०२१ मताचे फरकाने पराभव केला आहे.२२१ नेवासे विधानसभे करिता दि.२० नोव्हेंबर रोजी झालेल्या निवडणुकीत २ लाख २६ हजार २९ मतदान झाले होते. शनिवारी दि.२३ नोव्हेंबर रोजी मुकींदपूर येथील शासकीय गोडावून मध्ये मतमोजणी झाली.







सकाळी ७ वाजता मतमोजणी निरीक्षक जे.एल.बी.हरिप्रिया, निवडणूक निर्णय अधिकारी अरुण उंडे, उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत स्ट्रॉंग रूमचे सील तोडून ईव्हीएम मशीन (मतपेट्या) बाहेर काढण्यात आल्या सकाळी ८ वाजता प्रत्यक्ष मतमोजणीला सुरुवात झाली.

एकूण २७६ बुथची १४ टेबलावर २० फेऱ्यात मतमोजणी करण्यात आली.मतमोजणीच्या पहिल्या काही फे-यांपासूनचे लंघे आघाडीवर होते ते शेवटच्या फेरी अखेर आघाडीवरच राहिले लाडकी बहीण आणि माझी शेवटची निवडणूक ही लंघेची भावनिक साद यामुळे त्यांचा विजय सुकर झाला.

उमेदवारांना पडलेली मते...

221 नेवासा विधानसभा निवडणुकीत विठ्ठलराव लंघे 4021 मतांनी विजयी

उमेदवारांना पडलेली मते अशी...

1) शंकरराव गडाख (उबाठा शिवसेना-मशाल) 91423
2) विठ्ठलराव लंघे(शिवसेना-धनुष्यबाण) 95444 विजयी
3)हरिभाऊ चक्रनारायण(बसपा-हत्ती) 805
4) पोपट सरोदे(-वंचित-गॅस सिलेंडर) 663
5) बाळासाहेब मुरकुटे (प्रहार-बॅट) 35331
6) कांबळे लक्ष्मण(अपक्ष-कपाट) 229
7) जगन्नाथ कोरडे (अपक्ष-बॅटरीटॉर्च) 433
8) मुकुंद अभंग(अपक्ष-ग्रामोफोन) 148
9) वसंत कांगुणे(अपक्ष-चिमणी) 194
10) शरद माघाडे(अपक्ष-ट्रम्पेट) 370
11) सचिन दरंदले(अपक्ष-फलंदाज) 420
12) ज्ञानदेव पाडळे(अपक्ष-सफरचंद) 545
13) नोटा 1723

### २० वर्षाचा संघर्ष आज संपला

आम जनतेने व माझ्या महिला भगिनी यांनी हि निवडणूक हाती घेतली होती २० वर्षाची प्रतीक्षा आज संपली आहे आजी व माजी आमदारांचा पराभव केला. **- विठ्ठलरावं लंघे पाटील, नवनिर्वाचित आमदार.**

### हे ठरले विजयाचे शिल्पकार...

१) विठ्ठलाच्या विजयात पांडुरंगाची साथ अशी उपमा दिलेले व निवडणुकीत केंद्र बिंदू म्हणून ओळख असलेलले उद्योजक प्रभाकर (काका) शिंदे यांनी खऱ्या अर्थाने हा विजय खेचून आणला व लंघे यांच्या विजयाचे खरे सारथी ठरले

२) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजितदादा गटाचा एबी फॉर्म असताना देखील समजदारीची भूमिका घेत अब्दुल शेख यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल व अल्पसंख्याक समाज मोठ्या ताकतीने लंघे यांच्या पाठीशी उभा केला व लंघे यांची निवडणूक सोपी केली

३) उमेदवारी च्या रेस मध्ये पुढे असलेले भाजपाचे विधानसभा संयोजक सचिन देसरडा यांनी शंकरराव गडाख यांचे घोडेगाव व सोनई परिसरातील मताधिक्य रोखण्यासाठी कंबर कसली होती त्यामुळे ते देखील विजयाचे शिल्पकार बनले आहे. यासह भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष माऊली पेचे युवा नेते ऋषिकेश शेटे यांनी देखील मोठी ताकत पणाला लावली होती.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघात विक्रमसिंह यांचा ऐतिहासिक विजय

## तब्बल 36894 मतांनी विजयी

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

■ हा विजय बबन दादांच्या विचारधारेचा व कार्यकर्त्यांचा : आमदार विक्रम सिंह पाचपुते



श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टी पक्षाचे अधिकृत उमेदवार विक्रमसिंह बबनराव पाचपुते यांनी तब्बल 98931 एवढी प्रचंड मते घेत आजपर्यंत या मतदारसंघात सगळ्यात जास्त म्हणजे तब्बल 36894 एवढ्या फरकाने ही निवडणुक जिंकत श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघात विक्रम यांनी नवीन विक्रम केला.विक्रम पाचपुते यांनी कुठल्याही सेवा संस्था किंवा इतर कोणत्याही प्रकारची निवडणूक आतापर्यंत लढवली नव्हती या मतदार संघाचे विद्यमान आमदार बबनराव पाचपुते यांच्या आशीर्वादाने व कार्यकर्ते च्या आग्रहाखातर विक्रम पाचपुते यांनी थेट विधानसभा निवडणुक लढवायची ठरवली व सुरवातीपासुन या मतदारसंघात भारतीय जनता पार्टी चे विक्रम पाचपुते, शिवसेना उबाटा गटांच्या सौ ,अनुराधा नागवडे,अपक्ष उमेदवार राहुल जगताप व वंचित बहुजन आघाडीचे आण्णासाहेब शेलार यांच्यात अटीतटीचा सामना रंगला होता,या मतदारसंघात अपक्ष उमेदवार राहुल जगताप यांच्या उमेदवारीने रंगत आली होती, प्रत्येक उमेदवाराने ही निवडणुक प्रतिष्ठेची करत जोरदार तयारी केली होती.त्यामुळे या निवडणुकीत कोण विजयी होणार यांचा अंदाज कोणालाच येत नव्हता परंतु विक्रमसिंह पाचपुते यांनी पहिल्यांच निवडणुकीत आपला करीशमा दाखवत विजय तोही विक्रमी मतांनी संपादन केला यामध्ये महायुतीची ध्येयधोरणे,

या निवडणुकीत श्रीगोंदा तालुक्यातील दुसऱ्या फळीतील बहुतांशी नेते पाचपुते यांच्या व्यासपीठावर आले नाहीत, कुटुंबातील काही नी टोकांचा विरोध केला,पक्षाकडुन बळ मिळाले परंतु पक्षांच्या कोणत्याही बड्या नेत्यांनी या मतदारसंघात जाहिर प्रचार सभा घेतली गेली नाही म्हणून शेवटच्या टप्प्यावर ही निवडणुक पाचपुते कुटुंबाच्या हातुन जाते की काय अशी अवस्था झाली होती,परंतु ज्या काष्टी च्या चौकातुन आदरणीय बबनराव पाचपुते यांनी आपल्या राजकीय कारकीर्द ला सुरुवात केली त्यांच काष्टी च्या भैरवनाथ चौकात आमदार म्हणून माझं शेवटचं भाषण ऐकायला या अशी भावनिक साद आदरणीय बबनराव पाचपुते यांनी घातली व गावागातुन आलेल्या मतदारला या मतदारसंघाच्या विकासासाठी विक्रमसिंह ला वीजयी करण्याचे आव्हान केले, आजारपणामुळे या निवडणुकीत केलेले हे पहिले व शेवटचे भाषण मतदाराना भावले व वातावरण फीरले.पुन्हा एकदा या वयांत आजारपणातही आदरणीय बबनराव पाचपुते यांच्या भाषणाने करीशमा केल्याचे बोलले जात आहे.

अपक्ष उमेदवार माजी आमदार राहुल जगताप यांनी 62037 एवढे मतदान घेत आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे तसेच महाविकास आघाडीच्या उबाटा गटांच्या अधिकृत उमेदवार जिल्हा परिषदेच्या माजी सभापती अनुराधा नागवडे यांनी 53096 मते घेत हा मतदारसंघ संघ पिंजुन काढुन एक निष्ठावंत कार्यकर्ते व शिवसैनिक यांची फळी तयार केली भविष्यात त्या आपल्या कामकाजाचा ठसा उमठवणार यांत शंका नाहीं तसेच वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार आण्णासाहेब शेलार यांनी 27509 एवढी मत घेत आपले अस्तित्व अधोरेखित केले आहे.या सगळ्या बाबींचा विचार करुन भविष्यातील या मतदारसंघातील राजकारण साधलं जाणार आहे.

आजपर्यंत विद्यमान आमदार,माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी या मतदारसंघात केलेली विकासकामे व त्याचबरोबर हक्काचे जोडलेले कार्यकर्ते व मतदार, तसेच या निवडणुकीत जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य मातोश्री प्रतिभाताई पाचपुते, परीक्रमा शैक्षणिक संकुलाचे सर्वेसर्वा प्रतापसिंह पाचपुते ,महायुतीचे कार्यकर्ते, भारतीय जनता पार्टी चे श्रीगोंदा तालुक्यातील पदाधिकारी यांच्या झंझावाता प्रचार दौरा , योग्य नियोजन तसेच विक्रमसिंह पाचपुते यांनी केलेल्या अभ्यासपूर्ण भाषणातुन हा विजय सुकर झाल्याचे बोलले जात आहे. विक्रमसिंह पाचपुते मतमोजणीच्या सुरवातीपासुनच आघाडीवर होते प्रत्येक फेरीत त्यांची आघाडी वाढत गेली व अटीतटीची वाटणारी निवडणुक अगदी एकतर्फी झाली, विक्रम पाचपुते विजयी होताच मतदार संघातील प्रत्येक गावागावात व विशेषता श्रीगोंदा शहरात फटाके वाजवत, ढोल ताश्याच्या आवाजात आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

## वळसे पाटील यांच्या विजयामुळे खूप आनंद : किरण ताई वळसे पाटील



मंचर (स. गांवकरी) : आंबेगाव विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे विजयी उमेदवार दिलीप वळसे पाटील यांना तालुक्यातील जनतेने विजयी केल्याबद्दल खूप आनंद झाला आहे. त्याचबरोबर लाडकी बहीण योजनेमुळे तसेच 42 गावातील जनता, महिला, युवक यांच्यामुळे वळसे पाटील यांचा विजय निश्चित झाला .अशी प्रतिक्रिया किरणताई दिलीप वळसे पाटील यांनी शनिवार दिनांक 23 रोजी दिली. अवसरी खुर्द तालुका आंबेगाव येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात मतमोजणीनंतर विजयाची घोषणा करण्यात आल्यानंतर कार्यकर्त्यांचे आभार मानण्यासाठी किरणताई वळसे पाटील , सुषमा शिंदे आल्या . त्यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना किरणताई वळसे पाटील बोलत होत्या . उमेदवार दिलीप वळसे पाटील यांच्या विजयाने खूप आनंद झाला. त्यांच्या विजयामध्ये लाडक्या बहिणीं, युवक आणि सर्व कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग आहे.समोरच्या उमेदवार देवदत्त निकम यांच्याबाबत विचारले असता त्या म्हणाल्या समोरचा मुलगा चांगला आहे .यापूर्वीच मी त्यांना निवडणुकीच्या संदर्भात शुभेच्छा दिल्या होत्या. कोणाबद्दल वाईट बोलू नये. ही वळसे पाटील यांची शिकवण आहे. त्यामुळे आम्ही नेहमीच चांगले बोलणार बोगद्या संदर्भात विचारले असता त्या बाबत वळसे पाटील यांना विचारा असे किरणताई वळसे म्हणाल्या.

## आंबेगाव विधानसभा मतदारसंघात दडपशाही, आणि पैशाचा वापर



मंचर (स. गांवकरी) : आंबेगाव विधानसभा मतदारसंघात माझ्या समोरील उमेदवाराकडून प्रचंड पैशाचा वापर, दडपशाही, साम ,दाम ,दंड , याचा वापर केला आहे. म्हणून जनतेने त्यांना स्वीकारले आहे.अशी प्रतिक्रिया महाविकास आघाडीचे पराभूत देवदत्त निकम यांनी शनिवार दिनांक 23 रोजी दिली. आंबेगाव विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार देवदत्त निकम यांनी अवसरी खुर्द येथील मतमोजणी केंद्रा बाहेर निवडणूक निकाल जाहीर केल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना म्हणाले की समोरील उमेदवाराने तालुक्यात दहशत, दादागिरी, साम, दाम, दंड तसेच मोठ्या प्रमाणावर अर्थकारण, प्रचंड पैशाचा वापर, दडपशाही केल्याने तसेच देवदत्त निकम या नावाचे साधर्म्य असणारे उमेदवार माझ्या समोर उभा केला.आणि त्या उमेदवाराला मिळालेले चिन्ह ,त्यामुळे आमचे मतदान काही प्रमाणात कमी झाले आहे. आदिवासी भागातील जनतेने सुद्धा आम्हाला मोठ्या प्रमाणावर स्वीकारले आहे. समोरच्या उमेदवारांनी बोगद्या विषयी केलेले वक्तव्य याचा या मतदानावर काही परिणाम झाला नाही. तालुक्यातील जनतेने शरद पवार यांच्या सभेला दिलेल्या प्रतिसाद उल्लेखनीय होता. एका मंत्र्यांच्या विरोधात आम्ही मांडलेली भूमिका जनतेने स्वीकारली.हाच आमचा विजय आहे . या पुढील काळात आम्ही पक्षाचे काम करत राहू.

## आंबेगाव विधानसभा मतदारसंघात उमेदवारांना मिळालेली मते

मंचर (स. गांवकरी) : आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघात उमेदवारांना पडलेली कंसात एकुण मते - सुनील इंदोरे ( १४८३ ), दिलीप दत्तात्रय वळसे पाटील ( १०६८८८ ),देवदत्त जयवंतराव निकम ( १०५३६५), दिपक घोलप पाटील ( १११३ ), राजकुमार पंचमुख (१०७८ ), देवदत्त शिवाजीराव निकम (२९६५), लक्ष्मण महादू निकम (२११ ), निवृत्ती तुकाराम गावडे (२७६ ), संदीप शंकर वाघ ( ४१९ ), शितल संजय भारमळ (८०४ ), सुरेखा अनिल निघोट (७५६ ). टपाली मतदानात विजय उमेदवार महायुतीचे दिलीप वळसे पाटील यांना 793 , महाविकास आघाडीचे पराभूत उमेदवार देवदत्त निकम 931 आणि अपक्ष देवदत्त शिवाजीराव निकम यांना दहा मते मिळाली .तसेच ११५७ मते नोटाला मिळाली.

# महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री पदाचे दावेदार थोरात यांचा पराभव सर्वांना जिव्हारी लावून गेला

■ राहता मतदार संघातील पराभवासाठी हिंदुस्थानातील नेते दाखल मात्र गल्लीत गोंधळ दिल्लीत मुजरा सामान्य जनतेने दाखविला चमत्कार

■ मागील विधान सभा निवडणुकीत पिचड पिता पुत्रांची ४० वर्षाची सत्ता संपुष्टात. या विधानसभा निवडणुकीत थोरात परिवाराची 40 वर्षाची सत्ता संपुष्टात

■ उबाठा शिवसेना गटाचे खातेच ओपन नाही. तर शरद पवार गटाचे खाते झिरो

■ संगमनेरच्या राजकारणाला कलाटणी: थोरात कुटुंबाची 40 वर्षांची सत्ता एका तरुणाने आणली संपुष्टात, महायुतीचा विजयोत्सव!

**राहता : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर विधानसभा मतदारसंघातील निकालाने महाराष्ट्राच्या राजकारणाला नवी दिशा दिली आहे. तब्बल 40 वर्षांपासून अढळपदावर असलेल्या थोरात कुटुंबाची सत्ता एका तरुणाने संपुष्टात आणली. या ऐतिहासिक विजयाने केवळ संगमनेरच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात आणि राज्यात महायुतीचे प्राबल्य सिद्ध केले. महाविकास आघाडीला तब्बल 11 विधानसभा मतदारसंघांत पराभवाचा सामना करावा लागला, तर फक्त श्रीरामपूर मतदारसंघात काँग्रेसचे हेमंत ओगले यांना विजय मिळवता आला.

संगमनेरमधील सत्ता परिवर्तन: 40 वर्षांची परंपरा खंडित : संगमनेर मतदारसंघात थोरात कुटुंबाची 40 वर्षांपासूनची सत्ता यावेळी आव्हानाला सामोरी गेली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना एक तरुण उमेदवार अमोल खताळ यांनी पराभूत केले. भाजप आणि महायुतीच्या तर्फे राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली खताळ यांच्या प्रचाराची व्यूहरचना करण्यात आली होती. खताळ यांना "मानसपुत्र" मानणाऱ्या विखे पाटील यांनी या विजयासाठी सर्वस्व पणाला लावले होते.

महायुतीची भगवी लाट : महायुतीच्या विजयाचे मुख्य कारण म्हणजे हिंदुत्वाचा अजेंडा, लाडकी बहीण या घोषणेचा प्रभाव, आणि महायुतीतील घटक पक्षांमधील मजबूत एकता. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, आणि ठाकरे गट यांचे नेते मोठ्या संख्येने प्रचारासाठी आले होते, मात्र जनतेने त्यांच्या विरोधात कौल दिला. विखे पाटील आणि त्यांच्या पुत्रांनी संगमनेरच्या पराभवातून दक्षिण लोकसभा मतदारसंघात झालेल्या पराभवाचा वचपा काढला. अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकीय स्थितीचे विश्लेषण : अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण 12 विधानसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघांपैकी 11 ठिकाणी महायुतीने विजय मिळवला, तर महाविकास आघाडीला केवळ श्रीरामपूर मतदारसंघात यश आले. या निकालांनी जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती बदलून गेली आहे.

**महायुतीचे यशस्वी उमेदवार:**
**संगमनेर: अमोल खताळ (भाजप)**
**कर्जत-जामखेड: प्रा. राम शिंदे (भाजप)**
**राहुरी: शिवाजीराव कर्डिले (भाजप)**
**अकोले: डॉ. किरण लहामटे (राष्ट्रवादी,अजित पवार गट)**
**शेवगाव-पाथर्डी: मोनिका राजे (भाजप)**

राष्ट्रवादीचे शरद पवार गट आणि अजित पवार गट दोन्हींचा पराभव, ठाकरे गटाचे खाते उघडण्यात अपयश.

काँग्रेसचा टिकलेला बालेकिल्ला : फक्त श्रीरामपूर मतदारसंघात काँग्रेसचे हेमंत ओगले यांनी विजय मिळवला, ज्यामुळे काँग्रेसला काही प्रमाणात दिलासा मिळाला.

संगमनेरमधील निवडणुकीचा परिणाम आणि संदेश : या निवडणुकीत थोरात कुटुंबाच्या पराभवाने जनतेतील असंतोष स्पष्टपणे दिसून आला. थोरात कुटुंबीयांना जनतेने नाकारून युवा नेतृत्वाला संधी दिली. संगमनेरमधील विजय हा विखे गटासाठी महत्त्वाचा टप्पा ठरला.

राणी लंकेचा पराभव : लंके परिवाराला धक्का देत जनतेने "एकाच घरातून दोन उमेदवार नको" असा संदेश दिला. यामुळे विखे पिता-पुत्रांच्या प्रचार यंत्रणेचे यश ठळकपणे समोर आले.

महायुतीच्या विजयाचे विश्लेषण : महायुतीचा विजय हिंदुत्वाच्या अजेंड्यासोबतच "लाडकी बहीण, लाडके भाऊ" या भावनिक प्रचारावर आधारित होता. शिवाय भाजपच्या संघटनशक्तीने आणि विखे पाटील यांच्या प्रभावाने निवडणुकीत निर्णायक भूमिका बजावली.

महाविकास आघाडीच्या चुकलेल्या व्यूहरचनेचा फटका : काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे अंतर्गत वाद,

ठाकरे गटाची मर्यादित भूमिका,

थोरात यांच्यावरील स्थानिक नाराजी

### राजकीय परिणाम आणि पुढील वाटचाल

महायुतीच्या विजयानंतर महाराष्ट्रात एक नवा राजकीय अध्याय सुरू झाला आहे. संगमनेरमधील सत्ता परिवर्तन हे संपूर्ण जिल्ह्याच्या राजकारणासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. काँग्रेससाठी हा पराभव आत्मचिंतनाची संधी आहे, तर महायुतीसाठी हा विजय 2024 लोकसभा निवडणुकीसाठी मजबूत पाया आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील जनतेने दाखवलेला चमत्कार हा केवळ बदलाचा संकेत नसून संपूर्ण महाराष्ट्रासाठी नवा पायंडा घालणारा आहे. महायुतीच्या विजयोत्सवाने राज्यभर जल्लोषाचे वातावरण तयार झाले आहे.

**- डॉ. विश्वासराव आरोटे**
**कळसुबाई शिखरावरून**

# सव्वा लाखोंच्या फरकाने निवडून येत विधानसभा सदस्य म्हणून आशुतोष काळे यांचा पुन्हा विजय

**कोपरगाव : (समर्थ गांवकरी)**

आशुतोष काळे यांना एकदाच नव्हे, तर दुसऱ्यांदा कोपरगाव येथून विधानसभा सदस्य म्हणून निवडून येण्याचा मान मिळाला आहे. आशुतोष काळे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे संदीप वर्पे यांना पराभूत करून या निवडणुकीत 123838 मते मिळवली आणि पुन्हा एकदा जनतेच्या विश्वासावर विजय मिळवला.विजय मिळाल्यानंतर आशुतोष काळे यांनी आपल्या कार्यकर्त्यांचा, कुटुंबाचा आणि जनतेचा आभार मानले असून."हा विजय फक्त माझा नाही, तर प्रत्येक त्या कार्यकर्त्यांचा आहे, ज्यांनी या काळात मला साथ दिली. मी आमच्या मतदारसंघाच्या प्रगतीसाठी पुढे एक पाऊल ठेवलं आहे आणि पुढेही जनतेच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी काम करेन," असं आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.




दरम्यान या निवडणुकीत काळे यांना मिळालेल्या विजयामुळे मागील पंचवार्षिक मध्ये स्थानिक विकासासोबतच, बेरोजगारी आणि मुलभूत सुविधांच्या अजूनही सुधारणा करण्याची आशा निर्माण झाली आहे. जनतेच्या विश्वासाने त्यांना एक नवीन ऊर्जा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

"आम्ही आशुतोष काळे यांच्या विजयाच्या दृष्टीने खूप उत्साही आहोत. त्यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात खूप काम केले आणि आता पुन्हा त्यांना निवडून आलेले पाहून आम्हाला आणखी मोठ्या अपेक्षांचा विश्वास आहे,"

सुमनताई कोळपे लोकनियुक्त सरपंच,सुरेगाव व वाल्मिक अप्पा कोळपे अध्यक्ष, तंटामुक्ती सुरेगाव

आ.आशुतोष काळे यांची विधानसभा सदस्य म्हणून दुसऱ्यादा निवड झाल्याबद्दल सर्वात अगोदर शुभेच्छा,दादांचे परिश्रम, विकासाचा दृष्टिकोन आणि लोकांच्या कल्याणासाठी केलेल्या कष्टांचा पुरावा आहे. दादांच्या नेतृत्वाखाली कोपरगाव क्षेत्रात विकास, समृद्धी आणि परिवर्तनाची नवी दिशा मिळेल, अशी मला पूर्ण खात्री आहे. आपला कार्यकाळ यशस्वी, फलदायी आणि लोकहितासाठी समर्पित होणार.

सूर्यभान कोळपे संचालक, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना

विधानसभा सदस्य म्हणून दादांची पुन्हा निवड होणे हे विकासकामांसाठी घेतलेल्या कष्टाची, समर्पणाची आणि लोकसेवेतील उत्कृष्टतेची मोठे उदाहरण आहे. आपल्या नेतृत्वाखाली, आपल्या मतदारसंघात नवे प्रकल्प आणि विकासाची नवी दिशा मिळेल, साखर उद्योग आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी आपल्याकडून आणखी प्रभावी उपाययोजना होती.

# माऊलींचे संजीवन समाधी दिन सोहळ्यास हरिनाम गजरात प्रारंभ

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात आळंदी कार्तिकी यात्रा अंतर्गत तसेच श्रींचे ७५० व्या जन्मोत्सवी वर्षातील ७२९ व्या श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी दिन सोहळ्यास श्री गुरु हैबतबाबा यांचे पायरी पूजनाने हरिनाम गजरात वारकरी संप्रदायातील प्रथापरंपरांचे पालन करीत वीणा, टाळ, मृदंगाचा त्रिनादात श्रीक्षेत्रोपाध्ये वेदमूर्ती ब्रह्मवृंदाच्या वेदमंत्र जयघोषात आळंदी कार्तिकी यात्रेस प्रारंभ झाला. श्रींचे पायरी पूजन प्रसंगी श्रींचे पुजारी अमोल गांधी, यशोदीप जोशी, श्रीनिवास कुलकर्णी, विजय कुलकर्णी यांनी वेदमंत्र जयघोष करीत पौरोहित्य केले. या प्रसंगी श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा मालक बाळासाहेब आरफळकर, राजेंद्र आरफळकर, ऋषीकेश आरफळकर, आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त विधीतज्ज्ञ राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, डॉ.भावार्थ देखणे, माजी प्रमुख विश्वस्त डॉ. अभय टिळक, श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष विधीतज्ञ विष्णू तापकीर, आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे, पोलीस उपायुक्त राजेंद्र गौर, आळंदी पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक भिमा नरके, पोलीस नाईक मच्छिन्द्र शेंडे, शिवराज्याभिषेक रथपालखी सोहळ्याचे प्रवर्तक जनार्धन महाराज पाटील, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, तुकाराम माने, सेवक चोपदार रामभाऊ, मानकरी बाळासाहेब उर्फ योगीराज कुऱ्हाडे, स्वप्नील कुऱ्हाडे, मंगेश आरु, माजी नगरसेवक डी. डी. भोसले पाटील, आळंदी शहर शिवसेनेचे शहराध्यक्ष राहुल चव्हाण, काँग्रेस शहराध्यक्ष नंदकुमार वडगावकर, ज्ञानेश्वर गुळूंजकर, विठ्ठल घुंडरे, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर, भिमाजी घुंडरे पाटील, माजी व्यवस्थापक श्रीधर सरनाईक, भाजपचे नेते संकेत वाघमारे यांचेसह आळंदीकर ग्रामस्थ, वारकरी भाविक, दिंडीकरी उपस्थित होते.

# संगमनेर विधानसभा मतदारसंघात 40 वर्षांची सत्ता संपुष्टात; महाराष्ट्रात महायुतीची लाट !

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात संगमनेर विधानसभा मतदारसंघाने नवा अध्याय लिहिला आहे. गेल्या चार दशकांपासून राज्याच्या राजकारणात ठसा उमटवणाऱ्या थोरात कुटुंबीयांची सत्ता एका तरुण नेतृत्वाने उलथून टाकली. या ऐतिहासिक विजयाने केवळ संगमनेरच नाही, तर नगर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या राजकीय बदलाचे संकेत दिले आहेत.





**महायुतीच्या यशाची चमक** : अहिल्यानगर जिल्ह्यातील 12 विधानसभा मतदारसंघांपैकी 11 मतदारसंघांमध्ये महायुतीने विजय मिळवला. श्रीरामपूर मतदारसंघात काँग्रेसने एकमेव विजय मिळवला असला, तरी इतर मतदारसंघांमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे गट), आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांनी ताकद दाखवून दिली.

विशेषतः संगमनेरमध्ये महायुतीने इतिहास घडवला. राधाकृष्ण विखे पाटील आणि त्यांच्या सुपुत्राने थोरात कुटुंबीयांच्या सत्तेला आव्हान देत भगव्या लाटेचे नेतृत्व केले. या मतदारसंघात थोरात गटाच्या सत्तेचा पराभव करून महायुतीने जनतेचा विश्वास संपादन केला.

**अकोले आणि नेवासाच्या लढतीत परिवर्तनाचा झंकार** : नगर जिल्ह्यातील अकोले विधानसभा मतदारसंघात गेली 40 वर्षे सत्ता भोगणाऱ्या गटाला पराभव पत्करावा लागला. अमित भांगरे यांचा विजय जवळजवळ निश्चित वाटत होता, पण शेवटच्या फेरीत डॉ. लहामटे यांनी लीड घेत विजयी ठरले. नेवासामध्येही भाजपच्या उमेदवारांनी प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत आपले वर्चस्व सिद्ध केले.

**महायुतीच्या प्रभावशाली नेत्यांचे योगदान** : महायुतीचा विजय हा मुख्यतः राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मिळालेला आहे. त्यांच्या राजकीय मुत्सद्देगिरीने संगमनेर व इतर मतदारसंघात परिवर्तन घडवले. महायुतीने केवळ जिल्हा पातळीवरच नव्हे, तर राज्यभरात एकत्रित नेतृत्व आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यांवर जोर दिला.

**महाविकास आघाडीची दयनीय कामगिरी** : महाविकास आघाडीसाठी ही निवडणूक धक्कादायक ठरली. नगर जिल्ह्यातील 12 मतदारसंघांमध्ये केवळ एका मतदारसंघात काँग्रेसला यश मिळाले.

थोरात, लंके, पवार अशा दिग्गज नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला. लोकसभेतील अपयश भरून काढण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीने केला होता, मात्र जनतेने त्यांना स्पष्ट नकार दिला.

**अपक्षांची भूमिका ठळक** : या निवडणुकीत अपक्ष उमेदवारांनीही आपले अस्तित्व दाखवून दिले. काही ठिकाणी त्यांना महायुती व महाविकास आघाडीच्या दिग्गजांवर मात करता आली नाही, पण त्यांच्या उपस्थितीमुळे काही मतदारसंघांत मोठा प्रभाव पडला.

नगर जिल्ह्यातील परिणामांचा राज्यावर परिणाम:

नगर जिल्ह्यातील परिणामांनी राज्याच्या राजकीय चित्रावर महत्त्वपूर्ण परिणाम घडवले. महायुतीने नगर जिल्ह्यातील विजयानंतर संपूर्ण राज्यात सत्ता स्थापनेचा दावा करत जनतेचा मोठा पाठिंबा मिळवला. "लाडकी बहीण" या भावनिक घोषणेसह हिंदुत्वाचा मुद्दा प्रभावी ठरला.

उल्लेखनीय विजयी नेते:

संग्राम जगताप (अजित पवार गट) – नगर शहर

मोनिका राजा – शेवगाव पाथर्डी

प्रा. राम शिंदे – कर्जत जामखेड

शिवाजीराव कर्डिले – राहुरी

महायुतीचा विजय: परिवर्तनाची सुरुवात

महायुतीच्या ऐतिहासिक विजयाने महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या युगाची सुरुवात झाली आहे. संगमनेरसह इतर मतदारसंघांत झालेले परिवर्तन येत्या काळात राज्याच्या राजकारणावर लक्षणीय परिणाम करतील, हे निश्चित.

**- डॉ. विश्वासराव आरोटे**
**कळसुबाई शिखरावरून**


मा. श्री.
डॉ.किरण लहामटे
यांची दुसऱ्यांदा अकोले
विधानसभा
आमदार!
पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन
मा. ज्ञानेश्वर नवले (देहू)
चाकण - देहु मित्र मंडळ परिवार
मा. अण्णा सावंत
भोसरी, सामाजिक कार्यकर्ते
आ. डॉ. किरण लहामटे मित्र मंडळ, अ.नगर - पुणे जिल्हा


कार्यसम्राट
आमदार
मा.डॉ किरणजी
यमाजी लहामटे
हार्दिक अभिनंदन
इंजि. मा. सौरभ भरत धुमाळ
गव्हर्न. कॉन्ट्रॅक्टर, अकोले, जि.अ.नगर


मा. श्री.
डॉ.किरण लहामटे
यांची दुसऱ्यांदा अकोले
विधानसभा
आमदार!
पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन!!
- शुभेच्छुक -
मा. विजय खरात
अकोले, जि.अ.नगर


मा. श्री.
डॉ.किरण लहामटे
यांची अकोले विधानसभा
आमदार! पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन!!
इजि. ऋषिकेश
भाऊसाहेब लगड
गव्हं. कॉन्ट्रक्टर
मु.पो.अकोले, जि.अ.नगर


मा. श्री.
डॉ.किरण लहामटे
यांची अकोले विधानसभा
आमदार! पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन!!
- शुभेच्छुक -
इंजि. सागर आरोटे
गव्हर्नमेंट कॉन्ट्रक्टर
मु.पो.अकोले, ता.अकोले,जि.अ.नगर


मा. श्री.
डॉ.किरण लहामटे
यांची दुसऱ्यांदा अकोले
विधानसभा
आमदार!
पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन!!
- शुभेच्छुक -
इंजि.भुषण जानकु ढोकरे
गव्हर्नमेंट कॉन्ट्रक्टर
मु.पो.अकोले, ता.अकोले,जि.अ.नगर


कार्यसम्राट
आमदार
डॉ. किरणजी
लहामटे साहेब
हार्दिक
अभिनंदन
-: शुभेच्छूक :-
इंजि.रामनाथ मोरे
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
मु.पो.पिंपळगाव कोंझीरा, ता. संगमनेर, जि.अ.नगर
मोबा.९९८९०७३९२८


कार्यसम्राट
आमदार
डॉ. किरणजी
लहामटे साहेब
हार्दिक
अभिनंदन
-: शुभेच्छूक :-
इंजि. आदेश येवले
गव्हं.कॉन्ट्रक्टर / सामाजिक कार्यकर्ते
मु.पो.अकोले,जि.अ.नगर


मा. श्री.
डॉ.किरण लहामटे
यांची दुसऱ्यांदा अकोले
विधानसभा
आमदार!
पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन!!
-: शुभेच्छुक :-
इंजि.श्री.जावेदभाई
सलीम पठाण
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
मु.मेहेंदुरी, पो.रुंभोडी ता.अकोले, जि.अ.नगर


मा. श्री.
डॉ.किरण लहामटे
यांची दुसऱ्यांदा अकोले
विधानसभा
आमदार!
पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन!!
- शुभेच्छुक -
इंजि. आकाश राजेंद्र अस्वले
गव्हं.कॉन्ट्रक्टर / सामाजिक कार्यकर्ते
मु.पो.अकोले,जि.अ.नगर

# लंकेंच्या बालेकिल्ल्यात महायुतीचे काशिनाथ दाते विजयी

## अटीतटीच्या लढतीमधे अखेर दातेंची बाजी

पारनेर : (समर्थ गांवकरी)

पारनेर-नगर विधानसभा मतदार संघामधे अखेरच्या क्षणापर्यंत झालेल्याअटितटीच्या लढतीमधे महायुतीचे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे उमेदवार काशिनाथ दाते १ हजार ५२६ मतांनी विजयी झाले. दातेसरांना लाडक्या बहीणींनी दिलेली साथ आणि माजी खासदार सुजय विखे यांनी पारनेर तालुक्यामधे अखेरच्या क्षणी केलेली युव्हरचना तसेच,पारनेरचे माजी नगराध्यक्ष व अपक्ष उमेदवार विजय सदाशिव औटी यांना मतदानापूर्वी तीन दिवस अगोदर काशिनाथ दातेंना पाठींबा द्यायला लावला आणि येथुनच काशिनाथ दातेंचा विजयाचा मार्ग सुकर झाला.शिवाय नगर तालुक्यातील बहुतांशी गावांमधूनही काशिनाथ दाते यांनी निर्णायक आघाडी घेतली होती.महायुतीकडून 'कटेंगे तो बटेंगे'चा नारा दिला गेला आणि त्यास जनतेने प्रतिसाद देत दाते यांना विजयापर्यंत पोहोचविले.

सुजय विखेंच्या बाबतीत, "टायगर अभी भी जिंदा है..." याची प्रचिती या निवडणुकीमधुन आली. लोकसभेमधे झालेला पराभव सुजय विखेंच्या जिव्हारी लागला होता.लोकसभेला खा.निलेश लंकेंच्या विजयामधे बाळासाहेब थोरातांनी शक्ती पणाला लावली होती. तेव्हापासुनच विखेंचा संगमनेर संगमनेर आणि पारनेरमधे वॉच ठेवुन होते आणि ते या ठिकाणी गेमचेंजर ठरले आहेत.

काशिनाथ दाते यांचा विजय झाल्यानंतर निवडणुक निर्णय अधिकारी श्रीकुमार चिंचकर व मतमोजणी निरीक्षक सुवेंदर सिंह यांच्या हस्ते काशिनाथ दाते यांना विजयाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. या विधानसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांना १ लाख १३ हजार ६३० मते तर, महाविकास आघाडीचे उमेदवार राणी निलेश लंके यांना १ लाख १२ हजार १०४ मते मिळाली आहेत.





खा.निलेश लंके यांना लोकसभा निवडणुकीत ट्रम्पेंट या चिन्हाचा फटका बसला. तसा अनुभव या विधानसभा निवडणुकीत सुध्दा आला. अपक्ष उमेदवार सखाराम मालु सरक या राष्ट्रीय समाज पक्षाच्या उमेदवाराच्या ट्रम्पेंटला ३ हजार ५८२ मते मिळाली आहेत. बुधवारी दि.२३ नोव्हेंबर रोजी पारनेर येथील शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयामधे झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतमोजणी दरम्यान पहिल्या १४ ते १५ फेरीपर्यंत काशिनाथ दाते यांना चार ते पाच हजाराचे मताधिक्य होते.त्यानंतर १५ व्या फेरीला राणी लंके यांना १४४९ मतांची आघाडी मिळाल्याने २२ ते २३ फेरी पर्यंत राणी ताई लंके व काशिनाथ दाते या दोघांमध्ये दीड ते दोन हजार मतांची चुरस सुरु होती.त्यामुळे या मतमोजणी फेरी अखेर टपाली मतदानासह १ हजार ५२६ मतांचे मताधिक्य काशिनाथ दाते यांना मिळाल्याने त्यांना विजयी घोषित करण्यात आले.

या निवडणुकीमधे माझी ४० वर्षाची मेहनत कामाला आली. सामान्य जनता माझे कार्यकर्ते व नेते यांच्यामुळेच मला हा विजय मिळालेला आहे.

या विधानसभा मतदारसंघात माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी या निवडणुकीमधे शेवटच्या टप्प्यात वापरलेली रणनिती आणि लाडक्या बहीणींचा मिळालेला आशिर्वाद,त्यातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दोन सभा आणि कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची एक सभा यामुळे काशिनाथ दातेंचे वातावरण अखेरच्या क्षणी बदलले आणि सुरवातीला राणी लंके यांचा वाटणारा एकतर्फी विजय अडचणीचा झाला आणि काशिनाथ दाते हे विजयी झाले. मात्र मतमोजणी अखेरच्या फेरीपर्यंत हाय व्होल्टेज ड्रामा पहायला मिळाला.

> लोकसभा निवडणुकीत यश मिळाल्यानंतर खा. निलेश लंके यांनी नगरमधून सर्व १२ चे १२ उमेदवार निवडून आणतो असे जाहीर वक्तव्य एका सभेतुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांच्या समोर केले होते.मात्र आज बाकीच्या १२ जागा सोडा पण स्वत:ची जागासुध्दा वाचवता आली नाही याचे शल्य लंकेंना राहील.

या मतदार संघात शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख संदेश कार्ले यांनी केलेली बंडखोरी तसेच शेवटच्या टप्प्यात अपक्ष उमेदवार माजी नगराध्यक्ष विजय औटी यांनी दिलेला पाठींबा,तसेच सुरवातीलाच आपला उमेदवारी अर्ज मागे घेत दाते सरांना विजया पर्यंत घेवून जाणारे सुजित झावरेपाटील यांची भूमीकासुध्दा महत्वाची आहे.

पारनेर मतदार संघात सुरुवातीला एकतर्फी वाटणारी निवडणूक शेवटच्या टप्प्यात प्रचंड चुरशीची झाली. मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर प्रत्येक फेरीमधे काशिनाथ दाते यांना बऱ्यापैकी आघाडी मिळत होती मात्र, त्यानंतरच्या फेरीत ती कमी होत गेली.पुढे १५ व्या फेरी पासुन, शेवटच्या २७ व्या फेरी पर्यंत काय निकाल लागेल याची उत्सुकता कायम होती. अखेर २७ व्या फेरी अखेर दाते यांना २४०६ मतांची आघाडी मिळाली व त्यांचा विजयाचा मार्ग सुकर झाला.लोकसभेला विखेंच्या बाबतीत चालवलेला घराणेशाहीचा मुद्दा या विधानसभा निवडणुकीत लंकेंनासुध्दा लागु झाल्याची चर्चा होती.परंतू राणी लंके यांचा १५२६ मतांनी झालेला पराभव हा खासदार निलेश लंके व निलेश लंके प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

## पुढील पाच वर्ष प्रलंबित पाणी प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वाधिक वेळ देणार



मंचर (स. गांवकरी) : पुढील पाच वर्ष आंबेगाव विधानसभा मतदारसंघात पाण्याचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी सर्वाधिक वेळ देऊन योजना मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील . अशी माहिती महाविकास आघाडीचे विजयी उमेदवार दिलीप व ळसे पाटील यांनी दिली. मुंबई येथील निवासस्थानी दिलीप वळसे पाटील होते. त्यांच्याशी विजय झाल्याबद्दल त्यांच्या प्रतिक्रियांसाठी संपर्क साधला असता ते म्हणाले विजय हा विजयचा असतो .परंतु यामध्ये बोध घेण्यासारखे अनेक घटना घडल्या आहेत. त्याही दुरुस्त केल्या जातील .या विजयामध्ये महायुतीचे सर्व घटक पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते, लाडकी बहीण योजनेतील माझ्या बहिणी आणि युवक आणि ज्येष्ठांनी माझ्या विजयासाठी जे प्रयत्न केले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे .यापुढे सर्वसामान्यांचे आर्थिक स्तर उंचावण्यासाठी आणि थेट संपर्क ठेवून त्यांच्याशी अधिक घट्ट नाळ करण्याचा माझा प्रयत्न राहील .असेही वळसे पाटील यांनी नमूद केले. ते म्हणाले भीमाशंकर परिसरातील कळमजाई पाणी योजना, सातगाव पठार भागातील कलमोडीचा प्रश्न, लोणी धामणी परिसरासाठी उपयुक्त असणारी म्हाळसाकांत जलयोजना ,केंदुर पाबळ परिसराला वरदान ठरणारी पाणी योजना इत्यादी योजनांचा पाच वर्षाचा कृती आराखडा राबवून त्याचे काम मार्गी लावण्यासाठी माझा प्रामाणिक प्रयत्न राहणार आहे. मतदारसंघातील इतर विकास कामांनाही गती देऊन आंबेगाव विधानसभा मतदारसंघ विकासाचा पॅटर्न करण्यासाठी माझा प्रयत्न राहील, असे वळसे पाटील यांनी सांगितले.

## शिवसेनेचे राजेश गोवर्धन मोरे यांचा दणदणीत विजय

ठाणे,दिवा : (समर्थ गांवकरी)

कल्याण ग्रामीण विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे राजेश मोरे यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला आहे. त्यांना कल्याण ग्रामीण मधील सुमारे 1,41, 164 मतदारांनी आमदार म्हणून पसंती दिल्याचे पहावयास मिळत असून दुसऱ्या क्रमांकावर मनसे या पक्षाचे एकमेव माजी आमदार राजू पाटिल यांना एकूण 74, 768 मते मिळाली आहेत, तर शिवसेना ठाकरे गटाचे सुभाष भोईर यांना तिसऱ्या क्रमांकाची 71, 102 मते मिळाली. सुभाष भोईर आणि राजू पाटिल यांच्या मध्ये निवडणुकीत चुरस पाहायला मिळाली होती, या चुरशी मध्ये शिवसेना पक्षाचे राजेश मोरे यांचा मोठया मताधिक्याने झालेला विजय हा अनपेक्षित आणि अभूतपूर्व असा विजय आहे. यामध्ये शिवसेना पक्षाचा प्रचार आणि युव्हरचना यशस्वी झाल्याचे दिसत आहे. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार असून, मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता असल्याचे शिवसेना पदाधिकाऱ्यांचे मत आहे. दिव्यातील जनतेने



देखील राजेश मोरे यांच्या पारड्यात भरभरून मते टाकली आहे मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वात शहरप्रमुख रमाकांत मढवी व उपशहर प्रमुख शैलेश पाटील, उपशाहर प्रमुख आदेश भगत, तसेच विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखाप्रमुख, आधी पदाधिकारी यांनी यावेळी अथक परिश्रम घेऊन माझा विजय साकार केला व सर्व मतदार बांधवानी दिलेला प्रेम याचे देखील आभार मानतो असे यावेली आमदार राजेश मोरे यांनी बोलताना सांगितले.

## नवरसांच्या स्वरधुनींतून अजरामर 'गीतरामायणा'चे पुनर्जागरण

### विद्यार्थी साहाय्यक समितीतर्फे रंगले श्रीधर फडके यांचे भावपूर्ण सादरीकरण; रसिकांची उत्स्फूर्त दाद

पुणे : (समर्थ गांवकरी)

प्रत्येक देशवासियाच्या मनामनांत रुजलेल्या रामकथेला अजरामर शब्दसुरांत गुंफणाऱ्या 'गीतरामायणा'चा पुन:प्रत्यय रसिकांनी शुक्रवारी सायंकाळी येथे घेतला. 'सात स्वरांच्या स्वर्गामधुनी, नऊ रसांच्या नऊ स्वरधुनी' जणु अवतरल्याचा अनुभव रसिकांनी घेतला. 'पुत्र सांगती चरित पित्याचे...' या गदिमांच्या शब्दांची अनुभूती प्रख्यात गायक श्रीधर फडके यांनी आपल्या सादरीकरणातून रसिकांना दिली.




विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने ग. दि. माडगूळकर रचित, संगीतकार सुधीर फडके यांच्या गीतरामायणाचे सादरीकरण श्रीधर फडके यांनी केले. टिळक स्मारक मंदिर येथे हाऊसफुल्ल गर्दीत हा कार्यक्रम पार पडला. विद्यार्थी साहाय्यक समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्यासह समितीचे सर्व विश्वस्त, कार्यकर्ते, देणगीदार, माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुप्रिया केळवकर यांनी स्वागत प्रास्ताविकात समितीच्या कार्याविषयी माहिती दिली.

स्वये श्रीराम प्रभू ऐकती, दशरथा घे हे पायसदान, राम जन्मला गं सखे, सावळा गं रामचंद्र, ज्येष्ठ तुझा पुत्र मला देई दशरथा, चरण तुझे पाहिले आज मी शापमुक्त झाले, स्वयंवर झाले सीतेचे, जय गंगे जय भागीरथी, शेवटी करिता नम्र प्रणाम बोलले इतुके मज श्रीराम, माता न तू वैरिणी, पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा, सेतू बांधा रे सागरी, प्रभो मज एकच वर द्यावा, मज सांग लक्ष्मणा जाऊ कुठे, गा बाळांनो श्रीरामायण अशी गीते श्रीधर फडके यांनी सादर केली. सुकन्या जोशी, अभिजीत मोडक यांचे ओघवते निवेदन, तर तुषार आंग्रे (तबला), ओंकार पाटणकर आणि प्रणव कुलकर्णी (की बोर्ड), उद्धव कुंभार (तालवाद्ये) रश्मी भंडारी, गौरी सनगळ, योगेश पीतांबरे (समूहस्वर) यांची पूरक साथसंगत लाभली.

रामकथा गीतांच्या माध्यमातून उलगडताना श्रीधर फडके यांनी गीतरामायणाशी संबंधित अनेक आठवणी सांगितल्या. '१९५५ साली पुणे आकाशवाणीवरून गीतरामायण प्रथम सादर झाले. तेव्हा तत्कालीन अनेक प्रसिद्ध गायक कलाकार त्यात सहभागी झाले होते. गजाननराव वाटवे, मालती पांडे, माणिक वर्मा, ललिता फडके, लता मंगेशकर... अशी अनेक नावे त्यात होती.

कवी ग. दि. माडगूळकर आणि संगीतकार गायक सुधीर फडके हे अद्वैत होते. दोघांनाही चित्रपट सृष्टीचा अनुभव असल्याने जे भाव गीतांत तेच भाव संगीत व गायनात दिसले. गीताच्या प्रत्येक कडव्यात वेगळे चित्र गदिमांनी मांडले. गीतातील शब्दांना नेमक्या भावाचे कोंदण बाबूजींनी स्वरांतून दिले. अभिजात भारतीय संगीतातील रागांचा वापर केला आणि 'अवघ्या आशा श्रीरामार्पण' या भावनेने ते सदैव वावरले,' असेही श्रीधर फडके म्हणाले.


















# पोळा: सर्जा-राजाचा सण



या सणासाठी शेतकर्यांमध्ये उत्साह असतो. आपला बैल उठून दिसावा यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचा साजशृंगार खरेदी करतात. बैल सजवितात व पोळ्यात भाग घेतात. गावाच्या सीमेजवळ (आखर) एक मोठे आंब्याच्या पानाचे तोरण करून बांधतात. त्या जवळ गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनया, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात. या वेळेस 'झडत्या' (पोळ्याची गीते) म्हणायची पद्धत आहे. त्यानंतर, 'मानवाईक' (ज्याला गावात मान आहे तो-गावचा पाटील, श्रीमंत जमीनदार) यांच्यातर्फे तोरण तोडले जाते व पोळा 'फुटतो'. नंतर बैल मारुतीच्या देवळात नेण्यात येतात. मग त्यांना घरी नेऊन ओवाळण्यात येते. बैल नेर्णायास 'बोजारा' (पैसे) देण्यात येतात. असा हा पोळ्याचा सण आहे. पोळ्यास 'बैलपोळा' असे देखील म्हणतात. पोळा श्रावण अमावास्या या तिथीला साजरा करण्यात येतो. बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा सण आहे. ज्यांच्याकडे शेती नाही ते मातीच्या बैलांची पूजा करतात. शेतीप्रधान या देशात व शेतकर्यांत या सणाला विशेष महत्त्व आहे. या वेळेस पावसाचा जोर कमी झालेला असतो. शेतात पीकधान्य झुलत असते. सगळीकडे हिरवळ असते. श्रावणातले सण संपत आलेले असतात. एकूण सर्वत्र आनंदाचे वातावरण असते.

**पोळ्यासाठी सजवलेला बैल!**
पोळा हा बैलांचा उत्सव. शेतकर्यांना उत्साहीत करणारा असा हा उत्सव आहे. अनंत कष्ट करून अन्नधान्याचे उत्पादन करर्णाया शेतकर्याला आनंदी पहाणे कोणाला आवडणार नाही?

### उद्देश

- या उत्सवाद्वारे बैलांविषयी एकप्रकारे कृतज्ञता व्यक्त केली जाते.
- हा उत्सव साजरा केल्याने शेतात भरपूर धान्य पिकते आणि गोधन वाढते, असे समजले जाते.
- पोळ्याच्या दिवशी जे प्राणीमात्र आपल्या कष्टाने मानवाच्या जीवनाला आधारभूत झालेले आहेत, त्यांची पूजा आणि स्मरण केले जाते. यातून साधकाला गुरूद्वारे कळते की, जशी माज्यात ईशशक्ती कार्य करत आहे, तशीच या जगात निरनिराळ्या माध्यमांतून ती ईश्वरी सेवा म्हणून कार्य करत आहे. ही व्यापक दृष्टी निर्माण व्हावी, हा या उत्सवाचा उद्देश आहे.

**श्रावण** महिन्याची सुरुवातच सणांची उधळण करणारी असते. नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी आटोपलेली असते. या सणांबरोबरच सरत्या श्रावणात पिठोरी अमावास्या येते आणि संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो सर्जा-राजाचा सण म्हणजे 'पोळा.' या दिवशी, बैलांचा थाट असतो. या दिवशी त्यांना कामापासून आराम असतो. तुतारी (बैलांना हाकण्यासाठी वापरण्यात येणारी काडी ज्याचे टोकास, बैलांना टोचण्यासाठी टोकदार लोखंडी खिळा लावला असतो) वापरण्यात येत नाही. पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांना आमंत्रण (आवतण) देण्यात येते. पोळ्याला त्यांना नदी, ओढ्यात नेऊन धुण्यात येते. नंतर चारून घरी आणण्यात येते. या दिवशी बैलाच्या खोंडाला (मान व शरीराचा जोड-खांदा) हळद व तुपाने (सध्या महागाईमुळे तेलाने) शेकले जाते. त्यांच्या पाठीवर सुरेख नक्षीकाम केलेली झूल (एक प्रकारचे चादरीसारखे आवरण), सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, मटाट्या (एक प्रकारचा श्रृंगार), गळ्यात कवड्या व घुंगुरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा (आवरायची दोरी), पायात चांदीचे वा करदोड्याचे तोडे, खायला गोड पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा नैवेद्य.

बैलाची निगा राखर्णाया 'बैलकरी'घरगड्यास नवीन कपडे देण्यात येतात. या सणासाठी शेतकर्यांमध्ये उत्साह असतो. आपला बैल उठून दिसावा यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचा साजश्रृंगार खरेदी करतात. बैल सजवितात व पोळ्यात भाग घेतात. गावाच्या सीमेजवळ (आखर) एक मोठे आंब्याच्या पानाचे तोरण करून बांधतात. त्या जवळ गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनया, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात. या वेळेस 'झडत्या' (पोळ्याची गीते) म्हणायची पद्धत आहे. त्यानंतर, 'मानवाईक' (ज्याला गावात मान आहे तो-गावचा पाटील, श्रीमंत जमीनदार) यांच्यातर्फे तोरण तोडले जाते व पोळा 'फुटतो'. नंतर बैल मारुतीच्या देवळात नेण्यात येतात. मग त्यांना घरी नेऊन ओवाळण्यात येते. बैल नेर्णायास 'बोजारा' (पैसे) देण्यात येतात. असा हा पोळ्याचा सण आहे.

पोळ्याचे महत्त्व शेतकरीवर्गात फार आहे. शेतकरी या दिवसाची आतुरतेने वाट पाहत असतो. शेतकर्याचा सखा, मित्र सर्जा-राजाचा आजचा दिवस मानाचा असतो. पोळ्याच्या दिवशी बैलाला गाडीला अथवा नांगराला जुंपले जात नाही तर त्याचे पूजन केले जाते. पोळ्याच्या पहाटे शेतकरी आपल्या बैलांना नदीवर नेऊन त्यांची आंघोळ घालतो. त्यांच्या अंगाला हिंगूळ लावतात. शिंगाला रंग लावून त्याच्या अंगावर झूल टाकली जाते. गळ्यात सुतापासून तयार करण्यात आलेल्या माळा तर पायात घुंगरू बांधतात. अशा नाना तर्हेने सजविण्यात येते.

शेतकर्याच्या घरी बैलांचे स्वागत करण्यासाठी सुवासिनी सडा व रांगोळ्या काढून त्या पाहुण्यांची वाट पाहत असतात. तर घरात चुलीवर लाडक्या पाहुण्यासाठी खरपूस पुरणपोळी तयार होत असते. दुपारी खळ्यात बैलाला आमंत्रित करण्यासाठी शेतकरी सपत्नीक वाजतगाजत जातात व त्याला 'अतिथी देवो भवः' प्रमाणे घरी आणतात. घरातील सुहासिनी बैलांची विधिवत पूजन करून त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य देतात.

त्यासोबत त्यांच्या पुढे गहू-ज्वारीचे दान मांडतात. या दिवशी गावातील इतर घरातूनही बैलांना जेवणासाठी आमंत्रित केले जाते. शेतकर्याला औक्षण करून त्याला नारळ दिले जाते तर बैलांना पुरणपोळीचे जेवण दिले जाते. महाराष्ट्रातील काही गावामध्ये या दिवशी बैलांच्या शर्यतीचे आयोजन करून तेथे पोळा फोडला जातो. ज्या शेतकर्याचा बैल पोळा फोडेल म्हणजेच शर्यत जिंकेल त्या बैलाच्या अंगावर ग्रामपंचायतीतर्फे झूल टाकली जाते व शेतकर्याच्या डोक्यावर फेटा बांधून त्याचा सन्मान केला जातो. त्यानंतर गावातून बैलांची सवाद्य मिरवणूक काढली जाते.

अशा पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपूर्ण महाराष्ट्रात शेतकर्याचा जिव्हाळ्याचा सण पारंपरिक पोळा साजरा केला जातो.

याच पिठोरी अमावस्येच्या दिवशी सुवासिनी स्त्रिया व्रत करतात. दिवसभर उपवास करून सायंकाळी स्नान करतात. चौसष्ट योगिनींच्या चित्राच्या कागदाची पूजा करतात. घरातील मुलास अथवा मुलीस खीरपुरीचे जेवण देतात. पुरणपोळी खांद्यावरून मागे नेत 'अतित कोण?' असा प्रश्न विचारतात. आपल्या मुलाचे नाव घेऊन त्या प्रश्नाचे उत्तर देतात. स्त्रियांना अखंड सौभाग्य लाभावे यासाठी पिठोरी अमावस्येला फक्त स्त्रियाच हे व्रत मनोभावे करतात.

### उत्सव साजरा करण्याची पद्धत

शेतकर्यांमध्ये या उत्सवाला फार महत्त्व आहे. पेरण्या झाल्यानंतर शेतीच्या कामांतून बैल रिकामे झाले म्हणजे त्यांना न्हाऊ-माखू घालायचे, आरती ओवाळायची, नैवेद्य दाखवायचा आणि मग दुपारी रंगवून आणि श्रृंगारून गावातून मिरवत न्यायचे, असा हा उत्सवसोहळा असतो.

# लॅपटॉपचा कीबोर्ड झाला खराब, 'या' सोप्या स्टेप्स फॉलो करून घरच्या घरी करा रिपेअर

**लॅपटॉप चा वापर आजकाल खूपच वाढल्याने तो बिघडण्याच्या घटनाही वाढल्या आहेत. लॅपटॉपचा कीबोर्ड अनेकदा बिघडतो त्यामुळे हाच कीबोर्ड साफ करण्याच्या काही सोप्या पद्धतींबद्दल सांगणार आहे. त्यांच्या मदतीने तुम्ही घरबसल्या सहज कीबोर्ड साफ करू शकता.**

**लॅपटॉप** असो किंवा कॉम्प्युटर किबोर्ड हा दोन्हीतील एक महत्त्वाचा भाग आहे. आपण दररोज आणि सर्वाधिक वापर लॅपटॉप वापरताना किबोर्डचाच करत असतो. त्यामुळे कीबोर्डचं काम योग्य होण्यासाठी आणि तुम्हाला टायपिंगचा परिपूर्ण अनुभव येण्यासाठी वेळोवेळी तो साफ करणे खूप महत्वाचे आहे. कारण किबोर्ड खराब झाला तर खूप अडचण होऊ शकतो. तर तुम्हालाही तुमचा कीबोर्ड कसा स्वच्छ करायचा हे जाणून घ्यायचे असेल, तर आम्ही तुमच्यासाठी काही सोप्या टिप्स घेऊन आलो आहोतः

**सॉफ्ट ब्रश वापराः**

कीबोर्ड साफ करण्यासाठी सॉफ्ट ब्रश वापरा. कारण या ब्रशने तुम्हाला कीबोर्डमधील लहान किटाणू आणि घाण साफ करण्यास मदत होईल आणि बटणं खराबही होणार नाहीत.

**कीबोर्ड फ्लिप करा :**

कीबोर्ड साफ करण्यासाठी एक सोपी टिप म्हणजे किबोर्ड फ्लिप करा तो एकप्रकारे हळुवारपणे झाडा. यामुळे कीबोर्डवर असलेली धूळ निघून जाईल.

**सॅनिटायझर वापरा :**

अनेक वेळा कीबोर्डवर वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी पसरू शकतात, जसे की वेगवेगळं खाद्य देखील किबोर्डवर असू शकतं. यामुळे कीबोर्डच्या की आणि इंटरफेसवर चिकट काजळी तयार होऊ शकते. ते स्वच्छ करण्यासाठी अल्कोहोलिक सॅनिटायझर वापरा.

**योग्य साधनं वापरुन साफ करा :**

कीबोर्डमधील लहान छिद्रे साफ करण्यासाठी तुम्ही चिमटा, मेणाचा बल्ब यांसारखी छोटी साधने वापरू शकता. तसंच टूथपिक किंवा कॉटन स्वॅब वापरा. कीबोर्ड आणि कीबोर्डमधील गॅपमधून कचरा काढण्यासाठी तुम्ही टूथपिक किंवा कॉटन स्वॅब वापरू शकता.

हे काही सोपे आणि सोपे मार्ग आहेत ज्याचा वापर करून तुम्ही तुमचा लॅपटॉप कीबोर्ड घरीच स्वच्छ करू शकता. लक्षात घ्या की कीबोर्ड साफ करण्यापूर्वी, आपण तो पूर्णपणे बंद केला पाहिजे आणि थोडं पाणी वापरुन स्वच्छ करताना पाण्याचे थेंब जास्त विखुरू देऊ नका. तुम्ही या टिप्स फॉलो केल्यास, तुमचा कीबोर्ड जास्त काळ टिकेल आणि नवीन सारखा काम करेल.



# पिठोरी (दर्श) अमावास्या

**श्रावण अमावास्येला पिठोरी अमावस्या म्हणतात. परंपरेनुसार या दिवशी बैलांची पूजा केल्यानंतर आई आपल्या मुलांना वाण देते. पिठोरी व्रत करून आई पक्वान्न तयार करते. आणि ते डोक्यावर घेऊन 'अतिथी कोण?' असे विचारते. तेव्हा मुलं 'मी आहे' असे आपले नाव सांगून पक्वान्न मागील बाजूने स्वतःकडे घेऊन घेतात. पिठोरी अमावास्येला वंशवृद्धीसाठी ही पूजा करण्यात येते. म्हणूनच याला मातृ दिन असे ही म्हणतात.**

ही मुलांना दीघार्युष्य मिळावे यासाठी साजरी करण्यात येत असून या दिवशी सायंकाळी अंघोळ करून आठ कलश स्थापित केले जाता. त्यावर पूर्णपात्रे ठेवून ब्राह्मी, माहेश्वरी व इतर शक्तींची पूजा केली जाते. तांदुळाच्याराशीवर चौसष्ट योगिनींना आवाहन देऊन पिठाच्या मूर्ती तयार केल्या जातात. तसेच पिठाने तयार केलेल्या पदार्थांचाच नैवेद्य दाखवण्यात येतं.

नैवेद्याला वालाच बिरड, माठाची भाजी, तांदळाची खीर, पुंया, साटोरी आणि वडे तयार करण्यात येतात. अश्या रीतीने हे व्रत पूर्ण केले म्हणजे अखंड सौभाग्य व दीघार्यू पुत्र होतात.

आटपाट नगर होतं. तिथे एक गरीब ब्राह्मण राहत होता. त्याच्या घरी श्रावणातल्या अवसेच्या दिवशी वडिलांचे श्राद्ध असे. इकडे दरवर्षी काय होई? ज्या दिवशी श्राद्ध त्या दिवशी सकाळपासून त्याच्या सुनेचे पोट दुखू लागे व ब्राह्मण जेवायला बसण्याचे वेळेस बाळंत होऊन पोर मरून जाई. असं झालं म्हणजे ब्राह्मण तसेच उपाशी जात. असे सहा वर्षे झाले. सातव्या वर्षीही तसंच झालं, तेव्हा सासरा रागावला. ते मेलेले पोर तिच्या ओटीत घातले. तिला रानात हाकलून लावलं. पुढे जाता जाता ती एका मोठ्या अरण्यात गेली. तिथे तिला झोटिंगाची बायको भेटली. ती म्हणाली, बाई बाई, तू कोणाची कोण? इथे येण्याचे कारण काय? आलीस तशी लौकर जा. नाही तर माझा नवरा झोटिंग येईल आणि तुला मारून खाऊन टाकील!

तेव्हा ब्राह्मणाची सून म्हणाली, तेवढ्या करताच मी इथे आले आहे. झोटिंगाची बायको म्हणाली, बाई बाई, तू इतकी जिवावर उदार का? तशी ब्राह्मणाची सून आपली हकीकत सांगू लागली. ती म्हणाली, मी एका ब्राह्मणाची सून. दरवर्षी मी श्रावणी अवसेच्या दिवशी बाळंत होते व मूल मरून जाते. त्याच दिवशी आमच्या घरी माज्या आजेसास-याचे श्राद्ध असे. माझे असं झालं म्हणजे श्राद्धास आलेले ब्राह्मण उपाशी जात. अशी सहा बाळंतपणं माझी झाली. सातव्या खेपेलासुध्दा असंच झालं. तेव्हा मामंजीं माझा राग आला. ते मला म्हणाले, माझा बाप तुज्या बाळंतपणामुळं सात वर्षे उपाशी राहिला, तर तू घरातून चालती हो! असं म्हणून हे मेलेलं मूल माज्या ओटीत घातलं आणि मला घालवून दिलं. नंतर मी इथे आले. आता जगून तरी काय करायचे आहे? असं म्हणून रडू लागली. तशी झोटिंगाची बायको तिला म्हणाली, बाई तू भिऊ नको, घाबरू नको. अशीच थोडी पुढं जा. तिथ तुला एक शिवलिंग दृष्टीस पडेल. बेलाचं झाड लागेल, तिथे एका झाडावर बसून राहा.



रात्री नागकन्या, देवकन्या, साती अप्सरा बरोबर घेऊन तिथे पूजेला येतील. पूजा झाल्यावर खीरपुरीचा नैवेद्य दाखवतील आणि अतिथी कोण आहे म्हणून विचारतील. असे झाल्यावर मी आहे म्हणून म्हण. त्या तुला पाहतील. कोण, कोठची म्हणून चौकशी करतील. तेव्हा तू सगळी हकीकत त्यांना सांग! ब्राह्मणाच्या सुनेने बरं म्हटलं. तिथून उठली, पुढं गेली. तो एक बेलाचे झाड पाहिलं. तिथेच उभी राहिली. इकडे तिकडे पाहू लागली.

तो जवळच एक शिवलिंग दृष्टीस पडले. तशी ती शेजारच्या झाडावर बसून राहिली. इतक्यात रात्र झाली. तशी नागकन्या, देवकन्या आणि सात अप्सरांच्या स्वांयासुद्धा आल्या. त्यांनी शिवलिंगाची पूजा केली, नैवेद्य दाखविला आणि अतिथी कोण आहे? म्हणून विचारलं.

त्याबरोबर ती खाली उतरली मी आहे म्हणून म्हणाली. तेव्हा सगळ्यांनी मागे पाहिलं. त्यांना आश्चर्य वाटलं. तिची कोण, कोठली म्हणून चौकशी केली. तिनं सर्व हकीकत सांगितली. नागकन्या-देवकन्यांनी तिच्या मुलांची चौकशी केली. तेव्हा अप्सरांनी ती दाखवली. पुढे त्यांना तिच्या साती मुलांना जिवंत केलं आणि तिच्या हवाली केलं. पुढे तिला हे व्रत सांगितलं. चौसष्ट योगिनींची पूजा करायला सांगितली आणि मृत्युलोकी हे व्रत प्रकट करायला सांगितलं. तशी तिने विचारलं, ह्याने काय होतं ? अप्सरांनी सांगितलं. हे व्रत केले म्हणजे मुलबाळं दगावत नाहीत, सुखासमाधानांत राहतात. पुढे ती त्यांना नमस्कार करून निघाली. ती आपल्या गावांत आली. लोकांनी हिला पाहिलं, ब्राह्मणाला जाऊन सांगितले. भटजी भटजी, तुमची सून घरीं येते आहे. त्याला ते खोटं वाटलं. अर्ध घटकेनं पाहू लागला, तो मुलबाळं दृष्टीस पडू लागली. पाठीमागून सुनेला पाहिलं. तसा उठला, घरात गेला, मूठभर तांदूळ, तांब्याभर पाणी आणलं. तांदूळ सुनेवरून आणि मुलांवरून ओवाळून टाकून दिले. हातपाय धुऊन घरांत आला. सर्व हकीकत सुनेला विचारली. तिनं ती सारी सांगितली. पुढे सर्वांना आनंद झाला आणि मुला-बाळांसहित सुखाने ती नांदू लागली. ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

# केसात कोंडा होण्याची कारणे आणि त्यावरील उपाय



**केसांमध्ये कोंडा होणं ही अगदी सर्रास होणारी तक्रार आहे. अगदी १० वर्षांच्या मुलांपासून ते वयस्कर व्यक्तींपर्यंत कोणाच्याही डोक्यामध्ये कोंडा होऊ शकतो. या कोंड्यापासून सुटका मिळविण्यासाठी सध्या बाजारामध्ये विविध प्रकारचे शॅम्पू, तेल किंवा हेअर कंडिशनर उपलब्ध आहेत. मात्र अनेक वेळा या सार्याचा वापर केल्यानंतरही केसातील कोंडा काही केल्या कमी होण्याचं नाव घेत नाही. अशा वेळी काही घरगुती पयार्यांचा वापर केला तर त्याचा नक्कीच त्याचा फायदा होऊ शकतो.**

### केसांमध्ये कोंडा होण्याची कारणे -

**१.बुरशीचा संसर्ग -**

डोक्यावरची त्वचा सतत ओलसर राहिली तर त्वचेला बुरशीचा संसर्ग होऊ शकतो. यामुळे केसांत कोंडा होतो.

**२.ॲलर्जी -**

अनेक वेळा तरुणी वेगवेगळे शॅम्पू, तेल किंवा साबण यांचा वापर करत असतात. मात्र सतत ब्रॅण्ड बदलत राहिल्यामुळे त्याची ॲलर्जी होऊ शकते. त्याप्रमाणेच प्रदूषणातील काही घटकांमुळेही ॲलर्जी होऊ शकते. परिणामा, केसात कोंडा होऊ शकतो.

**३.केसांमधील उवा -**

केसांत उवा झाल्या असतील तरी कोंडा होऊ शकतो. उवांच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या घटकांमुळे डोक्यावरच्या त्वचेचे आरोग्य धोक्यात येते.



### कोंडा घालविण्यासाठी हे उपाय करा-

**१. मेथीचे दाणे -**

केसात कोंडा झाल्यानंतर मेथीच्या दाण्यांची पेस्ट करावी. ही पेस्ट केसांच्या मुळांशी लावावी आणि काही वेळानंतर ती धुवून टाकावी. असं केल्यानंतर कोंड्याचे प्रमाण कमी होते.

**२. सिताफळाच्या बिया -**

सिताफळ हे अत्यंत गुणकारी फळ असून या फळाप्रमाणेच त्याच्या बियाही तितक्याच गुणकारी आहेत. सिताफळाच्या बियांचे चूर्ण करुन ही पेस्ट रोज अर्धा तास केसांच्या मुळाशी लावावी. त्यानंतर ती धुवून टाकवी.

**३. खोबऱ्याचं तेल आणि भीमसेनी कापूर -**

गरम केलेल्या खोबरेल तेलात भीमसेनी कापूर घालावा आणि हे तेल गार करून त्याने केसांना मालिश करावी.

**४. तमालपत्र -**

तमालपत्राची (तेजपान) ७-८ पाने एक कप पाण्यात उकळून घेऊन त्या पाण्याने केस धुवावेत.

# वेळ सत्कारणी-वृद्धसेवा

**बखयापैकी** श्रीमंत असलेल्या कुटुंबाच्या काही सवयी असतात. विशेषतः वृद्ध स्त्रियांना पेपर वाचायचा असतो. सकाळ-संध्याकाळ बाहेर फिरून यायचे असते. ठराविक पदाथार्चा आस्वाद घ्यायचा असतो. वैयक्तिक अशी त्यांची कामे त्यांना करायची असतात. इतकेच नव्हे; तर आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठी व्यायामही करायचा असतो. तेवढे पथ्यही त्यांना पाळायचे असते. वेळच्या वेळी औषध घेणे आणि आरोग्य आबाधित ठेवण्यासाठी सोबतीला कोणी मदतनीस स्त्री मिळाली तर ती त्यांना हवी असते. ज्यांना अशा सेवेत रूची आहे, त्यांना ही कामे करता येतील.

आईवडिलांकडे लक्ष देता यावे म्हणून काही मुले- मुली खासगीरीत्या नर्स ठेवत असतात. पण ही नर्स फक्त आरोग्याची देखभाल करते. आपण पुढाकार घेतला तर सगोया गोष्टी करता येणे शक्य आहे.



# गुणकारी ज्येष्ठमध



**'ज्येष्ठमध' हे एक आयंव्द्धर्वेदिक औषध आहे. त्याला यष्टीमधंव्द्ध असे ही म्हटले जाते. संगीत शिकणाःयासाठी ज्येष्ठमध कंठ संव्द्धधारक म्हणून उपयोग करते. गॅस्ट्रिक अल्सर तसेच लहान आतड्यामध्ये होणाःया ड्यूओडनल अल्सरवरही ज्येष्ठमध हे लाभदायी ठरत असते.**



**ज्येष्ठमध** एक वनौषधी असून त्याचे झाड साधारण पाच ते सहा फूट उंचीचे असते. ज्येष्ठमधाच्या काड्या या चवीने गोड असतात. त्याचा उपयोग स्वयंपाक घरातील मसाल्यामध्येही केला जात असतो. आयंव्द्धवेर्दात ज्येष्ठमधाचे महत्त्व विषद करण्यात आले आहे. संव्द्धश्रंव्द्धत, अष्टांग हृदय, चरक संहिता सारख्या अतिप्राचीन ग्रंथांमध्ये त्याचा उल्लेख आढळतो. शंव्द्धद्ध हरपणे, पोट दंव्द्धखी, दमा, स्तनाचे आजार, गंव्द्धप्त आजार आदी आजारांवर ज्येष्ठमध गंव्द्धणकारी आहे. परदेशात स्त्रीयांच्या सेक्ससंबंधी आजारांवर त्याचा औषध म्हणून उपयोग केला जातो. ओल्या ज्येष्ठमधामध्ये पन्नास टक्के पाणी असते. ते संव्द्धखल्यानंतर केवळ दहा टक्के उरते. ज्येष्ठमधात ग्लिसराइजिक ॲसिडचे प्रमाण असल्याने त्याची चव साखरे पेक्षाही गोड असते.

संव्द्धश्रंव्द्धत, अष्टांग हृदय, चरक संहिता सारख्या अतिप्राचीन ग्रंथांमध्ये त्याचा उल्लेख आढळतो. शंव्द्धद्ध हरपणे, पोट दंव्द्धखी, दमा, स्तनाचे आजार, गंव्द्धप्त आजार आदी आजारांवर ज्येष्ठमध गंव्द्धणकारी आहे.

**पोटाचे विकार**

ज्येष्ठमधचे मंव्द्धळचे चूर्ण पोटाच्या विकारांसाठी अत्यंत गंव्द्धणकारी आहे. पोटात झालेली जखम त्याने लवकर भरून निघते. ज्येष्ठमधचे एक ग्रॅम चूर्ण पाण्यासोबत नियमित सेवन केल्याने स्तन व योनीसंबंधी आजार दूर होऊन त्यांच्यात सेक्सविषयी भावना जागृत होत असतात. तसेच स्त्रियांना आपले सौंदर्य अनंत काळापर्यंत टिकवून ठेवता येत असते.

**अल्सर**

गॅस्ट्रिक अल्सर व लहान आतड्यांना होणाःया ड्यूओडनल अल्सरवर ज्येष्ठमध हे अत्यंत प्रभावी औषध आहे. इतर औषधांच्या तंव्द्धलनेत ज्येष्ठमध, अल्सर हा आजार लवकर बरा करत असते.

**रक्ताची उल्टी**

रक्ताची उल्टी झालेल्या रुग्णाला दूध किंवा मधासोबत ज्येष्ठमध दिल्याने त्याला आराम पडतो. तसेच उचकी, सर्दी या आजारावर ज्येष्ठमध चूर्ण अधिक गंव्द्धणकारी आहे.

# अल्झायमरवर हळद उपयुक्त

**आपल्या देशात परंपरेने अनेक रोगांपासून सौंदर्यवृद्धीसाठी हळदीचा उपयोग केला जातो. पाश्चात्यांना आता त्याचे महत्त्व कळून येत आहे. अमेरिकेत नुकत्याच केलेल्या संशोधनात हळदीचा उपयोग अल्झायमरसारख्या रोगांवर नियंत्रण मिळविण्यासाठीही केला जात असल्याचे आढळले आहे.**

**अल्झायमरमुळे** हळूहळू स्मरणशक्ती कमी कमी होत जाते. त्याच्या निर्णयक्षमतेवरही त्याचा परिणाम होतो. कधी कधी तर स्मरणशक्ती पूर्णपणे जाते. वैद्यकीय शास्त्रात यावर अनेक उपाय आहेत, पण त्यांचा प्रभाव मयार्दीत आहे. त्यामुळे यासंदर्भात सतत संशोधन सुरू असते. हळदीत सापडणारे बिस डिमेथॉक्सी क्यूरक्यूमिन अल्झायमरवर उपयुक्त असल्याचे आढळले आहे.

भारतात साठ वषार्हून अधिक पाच टक्के लोक या रोगाने पिडीत आहेत. लॉस एंजिल्सच्या कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या डॉ. मीलन फिएला यांनी सांगितले, की हे नवे संशोधन अल्झायमरच्या रूग्णांसाठी आशेचा किरण आहे.

अर्थात, यासाठी आणखी संशोधनाची गरज आहे. नवी दिल्लीच्या सर गंगाराम रूग्णालयाचे न्यूरोलॉजी कन्सल्टंट डॉ. अंशू रोहतगी म्हणातात, की भारतीय आयुवेर्दात हळदीला सौंदर्य व आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त मानण्यात आले आहे. आता अल्झायमरसारख्या रोगांवरही हळद गुणकारी मानली जाऊ लागली आहे, याचा अर्थ ही भारतीय परंपरेला मिळालेली पावती आहे.



# किवी फळाचे आरोग्याला होणारे उपयोग

**किवी** फळ दिसायला चिकू सारखे दिसते. हे व्हिटॅमिन सीह्नं परिपूर्ण असते. कीवी हे फळ आजकाल बाजारात अगदी सहज उपलब्ध होत आहे. बटाट्याच्या आकाराचं आणि चिकूप्रमाणे दिसणारं फळ अगदी चविष्ट आहे. डॉक्टरांच्या मते दररोज एक किवी फळ खाल्ल्यानं व्यक्तीचे आयुष्य वाढते. किवी फळात सर्व उपयुक्त तत्व आहेत. ज्याची शरीराला गरज असते. फळात व्हिटॅमिन सीचं प्रमाण अधिक असल्यानं अनेक रोगांपासून आपला बचाव करण्यास मदत मिळते. सोबतच हे फळ डिप्रेशनची समस्याही दूर ठेवतो. हे फळ मधुमेहाच्या रुग्णांसाठी खुप उपयुक्त ठरतो.

- कीवीच्या फळामुळे आतड्यांचं आरोग्य सुधारण्यास मदत होते. त्यामधील ॲन्टिबॅक्टेरियल गुणधर्म आतड्यांमधील घातक बॅक्टेरियांचा नाश करतात.
- कीवीमध्ये व्हिटॅमिन ई आणि ॲन्टिऑक्सिडंट घटक मुबलक असतात. यामुळे त्वचेचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. यामुळे त्वचा मुलायम होण्यास मदत होते. त्वचेची कांती सुधारते.

कीवी फळाच्या सेवनामुळे घातक कोलेस्ट्रेरॉल घटक कमी होण्यास मदत होते. नियमित 8-10 आठवडे कीवीचे सेवन केल्यास कोलेस्ट्रेरॉलमुळे होणारा त्रास कमी होतो.

- रक्तदाबाचा त्रास नियंत्रणामध्ये ठेवण्यास कीवीचे फळ मदत करते. यामुळे रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुधारते.

